cmyk

## संपादकीय

### ‘हिंडेनबर्ग’चा दणका संशय निर्माण करणारा

अमेरिकेची हिंडेनबर्ग रिसर्च आणि अदानी समूह यांच्या दरम्यान सुरू असलेल्या वादात आता थेट ‘सेबी’ अध्यक्षा माधवी पुरी-बूच यांचे नाव आल्याने या प्रकरणाने तीन वर्षांनंतर पुन्हा एकदा उचल खाल्ली आहे. अदानी समूहातील गुतवणुकीवरून अमेरिकी वित्तसंस्थेला तपासाकरिता भारतातील कायद्याच्या कक्षेत आणणाऱ्या माधवी पुरी-बूच यांच्याच विरोधात हिंडेनबर्गने तथाकथित गुंतवणुकीचे आरोप केल्यानंतर काँग्रेससह विरोधी पक्षांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी करत मोदी सरकारवर हल्लाबोल केला आहे तसेच या प्रकरणाच्या सखोल चौकशीची मागणी केली आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### केमिकल पिल्याने ३३ मेंढ्यांचा जागीच मृत्यू

नांदेडःअधार्पूर – नांदेड राष्ट्रीय महामार्गावरील दाभड पाटीनजीक रस्त्याने जाणाऱ्या मेंढरांनी पाणी समजून वाहनात भरण्यात येणारे रसायन (युरिया मिस्कीड लिक्विड) मिश्रीत पाणी पिल्याने ३३ मेंढ्यांचा जागीच मृत्यू झाला. यात दोन मेंढपाळाचे जवळपास पाच लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. या प्रकरणी केमीकल विक्रेत्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. अर्धापूर तालुक्यातील देगाव (कु.) येथील मेंढपाळ रामकिशन भुजाजी बेळगे व योगेश मारोती वटे हे आपल्या जवळपास ३०० च्या वर मेंढ्या चारून दुपारी चार वाजताच्या सुमारास मुक्कामाच्या स्थळी घेऊन जात होते.त्याचवेळी ही घटना घडली.

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–११४ | बुधवार दि.१४ ऑगस्ट २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

# बीड जिल्ह्यासाठी ४०० कोटीचा पीकविमा मंजूर

## ३७८ कोटींचे वितरण पूर्ण, उर्वरित २२ कोटी तातडीने वितरित करण्याचे मंत्री धनंजय मुंडेंचे निर्देश



### बीड जिल्ह्याच्या प्रलंबित पीक विम्यासंदर्भात १५ दिवसात राज्यस्तरावर दुसऱ्यांदा बैठक

**मुंबई । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यात सन २०२३-२४ च्या खरीप व रब्बी हंगामात मिळून एकूण ४०० कोटी २४ लाख रुपये पीकविमा आतापर्यंत मंजूर करण्यात आला असून त्यापैकी आजपर्यंत ३७८ कोटी २१ लाख रुपयांचे वितरण संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात करण्यात आले आहेत. तर उर्वरित २२ कोटी ३ लाख रुपयांचे वितरण विमा कंपनीने कोणतेही कारण न देता ३१ ऑगस्ट च्या आत पूर्ण करावे, असे निर्देश मंगळवारी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी पीक विमा कंपनीस दिले आहेत.**

विमा कंपनीने अंबाजोगाई, परळीसह काही तालुक्यातील महसूल मंडळांमध्ये कोणतेही कारण न देता काही शेतकऱ्यांचे विमा अर्ज नाकारल्याचे निदर्शनास आले असून, कोणतेही तांत्रिक कारण किंवा सबब न देता ते सर्व विमा अर्ज कंपनीने मंजूर करून त्या शेतकऱ्यांना देखील त्यांचा प्रलंबित पीकविमा ३१ ऑगस्ट पूर्वी वितरित करावा, असेही निर्देश धनंजय मुंडे यांनी मंगळवारी संपन्न झालेल्या बैठकीत दिले आहेत. तसेच या दोन्हीही प्रक्रियांचा कृषी संचालक यांनी दैनंदिन स्वरूपात आढावा घ्यावा व मंत्री कार्यालयास अवगत करावे, असेही निर्देश मुंडेंनी आजच्या बैठकीत दिले आहेत. बीड जिल्ह्यातील प्रलंबित पिकविम्याच्या संदर्भात कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख अधिकारी व भारतीय कृषी विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांची एकत्रित बैठक संपन्न झाली. या बैठकीस कृषी संचालक विनयकुमार आवटे, उपसचिव श्रीमती नीता शिंदे, श्रीमती पाटील, भारतीय कृषी विमा कंपनीचे विभागीय व्यवस्थापक श्री सावंत यांच्यासह अधिकारी आदी उपस्थित होते. बीड जिल्ह्यात खरीप व रब्बी हंगामातील शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचा पीकविमा मिळावा यासाठी कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी सातत्याने पीकविमा कंपनीसमवेत बैठका घेऊन वेळोवेळी विमा वितरणाची व्यवस्था केलेली आहे. मागच्या १५ दिवसात राज्यस्तरावर आयोजित आजची दुसरी बैठक होती; कोणतेही कारण न देता शेतकऱ्यांचा पीकविमा नाकारल्यास प्रसंगी विमा कंपनीवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची देखील तयारी धनंजय मुंडे यांनी दाखवली होती. पावसाचा खंड, दुष्काळाचे निकष अशा तांत्रिक बाबीत अडचणी येताच मुंडेंनी कृषी ◀◀ पान २ वर

## मलनाथपूर शिवारातील सौर ऊर्जा प्रकल्पात २१ लाखाची चोरी

### अज्ञात चोरट्याविरुद्ध सिरसाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**परळी । प्रतिनिधी**

परळी शहर व तालुक्यात गेल्या काही दिवसापासून चोऱ्याचं सत्र मोठ्या प्रमाणात सुरू आहे. परळी शहरात गेल्या काही दिवसापूर्वीच स्नेहनगर भागात चोरी झाली होती. त्यानंतर आता मलनाथपुर शिवारातील सौर ऊर्जा प्रकल्पात केबल, वायर, कनेक्टर, लगेज चोरी गेल्याची घटना घडली आहे.२१ लाख ५ हजार ७०० रुपयांचे एकूण माल चोरी गेला आहे. या प्रकरणी सिरसाळा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सिरसाळा पोलीस करीत आहेत.

मलनाथपूर सोलर प्लांट मध्ये दि. ११ ते १२ ऑगस्ट २०२४ रोजी च्या दरम्यान रात्री ८ ते सकाळी ६ वाजायच्या वेळेत सौरऊर्जा प्लांट मध्ये चोरी झाल्याचे इंजिनीअर राहुल कराड समजले. मलनाथपुर येथील सोलार प्लान्ट मधील १२ आणी १३ इन्व्हटर मध्ये चोरी झाली. यात डीसी केबल २६ किमी लांब, एमसी ४, कनेक्टर २५०० सेट, अर्थींग केबल ३० मिटर, १६ स्केअर एमएम ५२ नोज लगेज असे साहित्य चोरीला गेलेले आहे. सदरील माहिती त इंजि. कराड यांनी सोलार एच पावर अँड एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड चे वरिष्ठ व्यवस्थापक सुधाकर त्रिभुवन शुक्ला यांना दिली. ते सोलर प्लन्ट वर गेले. तेथे जावुन पाहिले असता केबल, वायर व कनेक्टर लगेज आदी साहित्य ◀◀ पान २ वर

## वृत्तपत्र विक्रेत्यांना हक्काचा निवारा उपलब्ध करून देऊ

### डॉ.योगेश क्षीरसागर यांची ग्वाही; बीडमध्ये वृत्तपत्र विक्रेते, कामगारांना विमा संरक्षण

**बीड । प्रतिनिधी**

**ऊन, वादळ, वारा, पावसाची तमा न बाळगता वृत्तपत्र विक्रेते नियमितपणे वृत्तपत्र वाटपाचे काम करतात. संघटनेच्या मागणीनुसार विमा संरक्षण दिले. बीड बसस्थानकात वृत्तपत्र विक्रेत्यांना हक्काचा निवारा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करू, अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली.**

बीडमध्ये सामाजिक न्याय भवनाच्या सभागृहात मंगळवारी



(दि.१३) दोनेशहून अधिक वृत्तपत्र विक्रेत्यांसह कामगारांना विमा काढून प्रातिनिधिक स्वरूपात प्रमाणपत्राचे वाटप केले. यावेळी उद्घाटक म्हणून डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ वितरक प्रताप सासवडे हे होते. प्रमुख अतिथी म्हणून नगरसेवक गणेश वाघमारे, ज्येष्ठ पत्रकार विनोद पिंगळे, न्यू इंडिया एन्श्युरंस कंपनीचे व्यवस्थापक कैलास काळे, ◀◀ पान २ वर

### संपादक, वृत्तपत्र विक्रेत्यास श्रद्धांजली

नुकतेच निधन झालेले ज्येष्ठ संपादक कै.नामदेवराव क्षीरसागर, कै.रमेशआप्पा बेदरकर, कै.बाबासाहेब मस्के, कै.सुधाकर सोनवणे, वृत्तपत्र विक्रेते कै.रमेश देवळे यांना उपस्थितांकडून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

### पत्रकार संवाद यात्रेचे स्वागत

पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रा सुरू आहे. या संवाद यात्रेचे नेतृत्व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे हे करत आहे. त्यांची संवाद यात्रा बीडमध्ये सामाजिक न्याय भवनाच्या सभागृहात दाखल होताच डॉ.योगेश क्षीरसागर यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी पत्रकारांची उपस्थिती होती.

### राष्ट्रवादीच्या चिन्ह प्रकरणावरील सुनावणी पुन्हा लांबणीवर

नवी दिल्लीः राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नाव आणि चिन्ह तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे नागालँडमधील आमदार अपात्रता प्रकरण हे दोन्ही प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात सुनावणीसाठी एकत्र करण्यात आले आहेत. हे प्रकरण आजच्या वेळापत्रकात न्यायालयात सुनावणीला होते. मात्र वेळेअभावी ते सुनावणीपर्यंत येऊ शकले नाही. आता या याचिकेवर पुढील सुनावणी पुढच्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नाव आणि चिन्ह प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने १९ मार्चला अजित पवार गटाला नोटीस जारी केली होती आणि त्यांचे उत्तर ◀◀ पान २ वर

## बीड जिल्ह्यात वाढला काँग्रेसचा जनाधार

### तीन विधानसभा मतदारसंघावर काँग्रेसचा दावा–राजेसाहेब देशमुख

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अवघ्या दोन महिन्यांवर येऊन ठेपलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या वतीने लातूर या ठिकाणी महाराष्ट्राचे प्रभारी रमेशजी चेन्नीथला यांच्या अध्यक्षतेखाली बीड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांचा संघटनात्मक आढावा घेण्यात आला. यावेळी आगामी विधानसभा निवडणुकीच्या



अनुषंगाने संघटनेची सध्याची स्थिती, बूथ बांधणी, बीएलए, फ्रंटल, सेलचा आढावा घेवून पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधण्यात आला. यावेळी अतिशय प्रभावी आणि सकारात्मक पध्दतीने बीड जिल्ह्याची बाजू मांडत जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांनी बीड जिल्ह्यात काँग्रेसचा जनाधार दिवसेंदिवस वाढत असल्याचे सांगत बीड, गेवराई, केज आणि परळी यापैकी तीन विधानसभा मतदारसंघावर काँग्रेसच्या वतीने दावा करण्यात आला. यावेळी प्रामुख्याने परळी मतदारसंघ काँग्रेसला सोडावा व तेथून काँग्रेस पक्षानेच निवडणूक लढवावी अशी मागणी ◀◀ पान २ वर

## नगराध्यक्षांचा कालावधी अडीचऐवजी ५ वर्षे; मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकांच्या घोषणेपूर्वी कॅबिनेट बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले जात असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत ८ मोठे निर्णय घेण्यात आले असून, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा आढावादेखील घेण्यात आला आहे. तसेच, राज्यातील नगरपंचायत व





नगरपालिकांमधील नगराध्यक्षांचा कालावधी आता २.५ ऐवजी ५ वर्षे करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

राज्यात एकीकडे २ वर्षांपासून बहुतांश नगरपालिका, नगरपंचायत आणि महापालिकांमध्ये प्रशासन राज आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाच न झाल्यामुळे येथील नगराध्यक्षपदाची खुर्ची रिकामी असून तो पदभारही प्रशासनाकडे आहे. त्यातच आता राज्यातील उर्वरित नगर पंचायतींमधील नगराध्यक्षांचा ◀◀ पान २ वर

## विदर्भ- मराठवाड्यातील दुग्धविकास प्रकल्पांसाठी १४९ कोटींच्या निधीला मान्यता

**मुंबई । प्रतिनिधी**

**मराठवाडा आणि विदर्भातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासह पशुपालन व दुग्धव्यवसायातून शेतकऱ्यांना चालना देण्यासाठी दूग्ध विकास प्रकल्प राबवले जात आहेत. याआधी विदर्भ आणि मराठवाड्यात पहिल्या टप्प्यात ११ जिल्ह्यात काम सुरू केले गेले असून आता उर्वरीत ८ जिल्ह्यात देखील दूग्ध विकास प्रकल्पांच्या कामांना मान्यता देण्यात आली आहे. तर विदर्भ आणि मराठवाड्यातील दुसऱ्या टप्प्यातील प्रकल्पांच्या कामासाठी १४९.२६ कोटी रुपयांच्या निधीला मान्यता देण्यात आली आहे.**

हे प्रकल्प राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ (एनडीडीबी) आणि मदर डेअरी यांच्या सहकार्याने केले जाणार असल्याची माहिती पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. मराठवाडा आणि विदर्भातील दूग्ध विकास प्रकल्पांबाबत मंगळवारी (दि. १३) राज्य ◀◀ पान २ वर

## जगताप, मुळूक यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यातील शिवसैनिकांचा शिंदे गटात प्रवेश

### उबाठा सेनेतील अॅड.संगीता चव्हाण, रविराज बडे, गजानन कदम यांच्यासह हजारो कार्यकर्त्यांचा समावेश

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप आणि सचिन मुळूक यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यातील उबाठा सेना महिला आघाडीच्या जिल्हा संघटक तथा राज्य महिला आयोगाच्या सदस्य ऍड.संगीता चव्हाण तसेच बीड जिल्ह्याचे युवासेना जिल्हाप्रमुख गजानन कदम,



युवासेनेचे जिल्हाप्रमुख अॅड. रविराज बडे आणि त्यांच्या हजारो कार्यकर्त्यांचा शिवसेनेतील प्रवेश हा ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१३ ऑगस्ट २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ७.०० क्विंटल | २,३०० | २,६३५ | २,४६८ |
| ज्वारी/हायब्रिड :५९.५० क्विंटल | २,१३१ | २,६०१ | २,३२० |
| मूग :१.५० क्विंटल | ७,७०० | ७,७०० | ७,७०० |
| तूर : २.०० क्विंटल | ७,७०१ | ७,७०१ | ७,७०१ |
| उडीद : २.५० क्विंटल | ४,९०१ | ७,४०० | ६,१५० |
| बाजरी: २८.०० क्विंटल | २,४७१ | ३,३९० | २,७५० |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: ३१.०० क्विंटल | ४,२०० | ४,२०० | ४,२०० |
| हरभरा: ८.०० क्विंटल | ६,५८० | ६,५८० | ६,५८० |

# ...तर ‘लाडकी बहीण’ योजना थांबवू

## सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला फटकारले

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

महाराष्ट्र सरकारची ‘लाडकी बहीण’ ही योजना सध्या चर्चेत आहे. या योजनेवर मंगळवारी सर्वोच्च न्यायालयाने टिप्पणी केली. इतर मोबदला द्यायला पैसे नसतील तर लाडकी बहिण योजना थांबवावी लागेल, असे म्हणत न्यायालयाने सरकारला फटकारले.

सर्वोच्च न्यायालयाने एका प्रकरणात राज्य सरकारला चांगलेच फटकारले. पुण्याजवळील जमीन प्रकरणातील याचिकाकर्त्यांना मोबदला द्या, नाहीतर लाडकी बहीण सारख्या योजनांवर बंदी घालण्याचे आदेश द्यावे लागतील. असा इशारा सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारला दिला. या अगोदरही जमीन प्रकरणीच्या सुनावणीत सरकारला ◀◀ पान २ वर

### तिजोरीवर ताण पडणार...

लोकांच्या खात्यात थेट पैसे जमा करण्याच्या योजनांमुळे वित्तीय तूट हाताबाहेर जाण्याची शक्यता आहे. याचा परिणाम भांडवली खर्चावर होईल. योजनांवरील खर्च वाढल्याने भांडवली खर्चाला कात्री लावावी लागेल, असे संभाव्य धोके इंडिया रेटिंग्स अँड रिसर्चने आपल्या अहवालात सांगितले आहेत. २०२५ मधील वित्तीय तूट २.५ टक्के अपेक्षित होती. पण ती आता ३ टक्क्यांवर जाण्याची भीती अहवालातून वर्तवण्यात आली आहे. योजना आणि प्रकल्पांवर होणारा खर्च भागवण्यासाठी राज्य सरकारला अधिक कर्ज घेण्याची गरज भासू शकते. महायुती सरकार मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेवर २५ हजार कोटी रुपये खर्च करणार आहे. तर कौशल्य विकासावर ६ हजार ५६ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. याशिवाय सामाजिक न्यायासाठी ४ हजार १८५ कोटी रुपयांची तरतूद असल्याची आकडेवारी इंडिया रेटिंग्स अँड रिसर्चने अहवालात मांडली आहे.



cmyk

cmyk



## अग्रलेख

# ‘हिंडेनबर्ग’चा दणका संशय निर्माण करणारा

अमेरिकेची हिंडेनबर्ग रिसर्च आणि अदानी समूह यांच्या दरम्यान सुरू असलेल्या वादात आता थेट ‘सेबी’ अध्यक्षा माधवी पुरी–बूच यांचे नाव आल्याने या प्रकरणाने तीन वर्षांनंतर पुन्हा एकदा उचल खाल्ली आहे. अदानी समूहातील गुंतवणुकीवरून अमेरिकी वित्तसंस्थेला तपासाकरिता भारतातील कायद्याच्या कक्षेत आणणाऱ्या माधवी पुरी–बूच यांच्याच विरोधात हिंडेनबर्गने तथाकथित गुंतवणुकीचे आरोप केल्यानंतर काँग्रेससह विरोधी पक्षांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी करत मोदी सरकारवर हल्लाबोल केला आहे तसेच या प्रकरणाच्या सखोल चौकशीची मागणी केली आहे.

हिंडेनबर्गने अदानी समूह आणि भारतीय शेअर बाजार नियंत्रक ‘सेबी’ यांच्यावर आरोप केल्यानंतर विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी ‘सेबी’च्या कामकाजावर प्रश्न उपस्थित केले आहेत. किरकोळ गुंतवणूकदारांच्या संपत्तीचे रक्षण करण्याची जबाबदारी असलेल्या ‘सेबी’ची विश्वासार्हता, त्यांच्या अध्यक्षांवरील आरोपामुळे धोक्यात आली आहे. ‘सेबी’च्या अध्यक्षा माधवी पुरी–बूच यांनी अद्याप राजीनामा का दिला नाही? असा प्रश्न देशभरातील प्रामाणिक गुंतवणूकदार सरकारला विचारत आहेत. गुंतवणूकदारांनी कष्टाने कमावलेला पैसा बुडाला तर त्याला जबाबदार कोण? अदानीवर लावलेले नवीन आणि अत्यंत गंभीर आरोप पाहता, सर्वोच्च न्यायालय स्वत:हून या प्रकरणाची पुन्हा चौकशी करेल का? असे प्रश्न राहुल गांधी यांनी उपस्थित केले आहेत. माधवी पुरी–बूच यांनी आपले पद व आपला पूर्वेतिहास पारदर्शक असल्याचा दावा केला आहे. हिंडेनबर्गचे आरोप हे बिनबुडाचे असून महत्त्वाच्या पदावर विराजमान होण्यापूर्वीच आपण गुंतवणूक जाहीर करण्याबाबतची सर्व प्रक्रिया पूर्ण केल्याचा दावा केला आहे. ‘सेबी’च्या महत्त्वाच्या पदावर आल्यानंतर आणि येण्यापूर्वीही माझे वैयक्तिक आयुष्य तसेच माझी कारकीर्द पारदर्शक राहिली आहे. पद स्वीकारण्यापूर्वीच मी कायद्याप्रमाणे सर्व माहिती नोंदविलेली आहे. आरोप करण्यात आलेले व्यवहार व कंपनी यांच्याशी माझा तसेच माझ्या पतीचा काहीही संबंध नाही. हिंडेनबर्गचे आरोप पूर्वग्रहदूषित व हेतुपुरस्सर आहेत असे माधवी पुरी–बूच यांनी म्हटले आहे. अदानी समूहाने हिंडेनबर्गने आपले पूर्वीचे आरोप नव्याने केले असून त्यात कोणतेही तथ्य नसल्याचे म्हटले आहे. ‘हिंडेनबर्ग’ला भारतामधील विविध नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. त्याला उत्तर देण्याऐवजी त्यांनी ‘सेबी’च्या विश्वसनीयतेवर हल्ला करण्याचा आणि ‘सेबी’च्या अध्यक्षांचे चारित्र्यहनन करण्याचा पर्याय निवडला हे दुर्दैवी आहे असे माधवी बूच म्हणाल्या. ‘सेबी’ अध्यक्षांवर आरोप करून देशाची अर्थव्यवस्था डळमळीत करण्याचा विरोधकांचा डाव असल्याचा आरोप सत्ताधारी भाजपने केला आहे. विकसिततेकडे भारताचा प्रवास सुरू असताना विरोधकांच्या पोटात दुखत असल्याचे भाजपने म्हटले आहे. अदानी समूहातील कंपन्यांमध्ये ‘सेबी’च्या अध्यक्षा व त्यांचे पती धवल बूच यांची गुंतवणूक असल्याचा आरोप करणारा अहवाल हिंडेनबर्गने शनिवारी जाहीर केला होता. अदानी समूहातील भारताबाहेरील कंपन्यांमध्ये माधवी पुरी आणि त्यांचे पती यांची गुंतवणूक असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. भारतातील अर्थव्यवस्थेबाबत आपण आणखी एक धक्कादायक अहवाल जारी करू, असे हिंडेनबर्गने यापूर्वीच जाहीर केले होते. हिंडेनबर्गने केलेल्या नव्या आरोपानंतर ‘सेबी’ अध्यक्षांबाबत संशयाचे वातावरण निर्माण झाले असून संयुक्त संसदीय समितीमार्फत (जेपीसी) या प्रकरणी चौकशी करण्यात यावी अशी मागणी प्रमुख विरोधी पक्ष काँग्रेसने केली आहे. नव्या अहवालावरून ‘जितके मोठे उद्योग समूह तितके मोठे घोटाळे’असे जणू समीकरणच बनले आहे की काय अशी शंका येते. सारेच मोठे उद्योग समूह घोटाळेबाज आहेत असे नाही. काही उद्योग समूह सचोटीने उद्योग करून देशाला अभिमान वाटावा अशी कामगिरी करणारे आहेत तर काही उद्योग समूह अल्पावधीत पुढे जाण्यासाठी या ना त्या मार्गाचा अवलंब करणारेही आहेत. अशा उद्योग समूहांचे बिंग कधी ना कधी फुटतेच.

‘सेबी’च्या अध्यक्षा माधवी पुरी यांचे एका विशिष्ट उद्योग समूहाशी संबंध असल्याने त्यांनी गत दीड वर्षात त्या उद्योग समूहावर कारवाई केली नाही, असा आरोप आपल्या ताज्या अहवालात करत हिंडेनबर्ग रिसर्चने भारताला दुसरा धक्का दिला आहे. या आधी २०२३ मध्ये एका समूहाबाबत एक अहवाल जारी करून हिंडेनबर्ग भारताच्या राजकीय आणि आर्थिक क्षेत्रात चर्चेचा विषय बनला होता. या विशिष्ट समूहाच्या अध्यक्षांनी २०२२ पासून सात कंपन्यांच्या शेअर मूल्यात हेराफेरी करून आपल्या संपत्तीत शंभर दशकोटींची भर टाकल्याचा आरोप हिंडेनबर्गने केला होता. त्यावेळी भारतात प्रचंड खळबळ उडाली होती आणि त्या उद्योग समूहाचे शेअर्सही घसरले होते. त्या आरोपांची सखोल चौकशी होईल अशी अपेक्षा होती. हिंडेनबर्ग रिसर्चला ते अपेक्षित होते, मात्र ‘सेबी’ने हिंडेनबर्ग रिसर्चलाच कारणे दाखवत नोटीस बजावली आणि वेळ मारून नेली. गत दीड वर्षाच्या काळात या आरोपांच्या चौकशीबाबत काहीच झाले नाही. त्यामुळे आता हिंडेनबर्गने दुसरा धक्का दिला आहे.

हिंडेनबर्ग रिसर्च ही गुंतवणूक संशोधन क्षेत्रात काम करणारी अमेरिकन कंपनी आहे. आर्थिक लेखा अनियमितता, अनैतिक व्यावसायिक प्रथा, अघोषित व्यवहारांची चौकशी आणि विश्लेषण करण्यात ही कंपनी निष्णात मानली जाते. २०१७ पासून हिंडेनबर्गने अनेक खासगी कंपन्यांच्या अवैध व्यवहारांवर प्रकाश टाकणारे सुमारे १६ अहवाल प्रसिद्ध केले आहेत. त्यामुळे मोठ्या उलथापालथीही झाल्या आहेत.

## गुटखा माफियांवर पोलिसांची मोठी कारवाई; ७० लाखांचा मुद्देमाल जप्त

**जालना । प्रतिनिधी**

एलसीबीने केलेल्या कारवाईत ५० लाख ८२ हजार रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला. गुटख्याची वाहतूक करणारा २० लाखांचा ट्रकही ताब्यात घेण्यात आला आहे. ही कारवाई सोमवारी रात्रीच्या सुमारास जालना – अंबड मार्गावरील लालवाडी शिवारात करण्यात आली. अन्न प्रशासन विभागाचे अजिंठेकर यांच्याकडून गुन्हा दाखल करण्यास होतो उशीर तसेच अजिंठेकर यांना शहरांमध्ये लाखो रुपयांचा गुटखा विक्री होत असून त्यावर कारवाई का होत नाही उलट सुलट चर्चा सुरू आहे.



बीडहून जालन्याच्या दिशेने येणार्या एका ट्रकमध्ये गुटख्याची अवैधरीत्या वाहतूक केली जात असल्याची माहिती पो.नि. पंकज जाधव यांना मिळाली होती. त्या माहितीवरून पथकाने सोमवारी रात्री जालना – बीड महामार्गावरील लालवाडी शिवारातील जगदंबा राजस्थानी हॉटेलसमोर संबंधित ट्रक (क्र. एमएच १५ – सीके ०१९१) थांबविला. ट्रकची पाहणी केली असता आतमध्ये ५० लाख ८२ हजर रुपयांचा गुटखा आढळून आला. पोलिसांनी चालक राजेंद्र भानुदास चव्हाण (वय ३५, रा. सुर्याची वाडी, ता. जि. बीड) याच्यासह ७० लाख ८२ हजार रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेतला. ही कारवाई पोलिस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अपर पोलिस अधीक्षक आयुष नोपाणी यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पो.नि. पंकज जाधव, स.पो.नि. योगेश उबाळे, पो.उप.नि. राजेंद्र वाघ, अंमलदार लक्ष्मीकांत आढेप, गोपाल गोशीक, देवीदास भोजणे, सचिन राऊत, भागवत खरात, सोपान क्षीरसागर, कैलास चेके यांच्या पथकाने केली.

## नंदकुमार ठाकुरांची पोलीस प्रशिक्षण केंद्रात रवानगी

**बीड । प्रतिनिधी**

**बीडमधील पोलीस अधीक्षक पदाची कारकीर्द वादग्रस्त ठरलेले नंदकुमार ठाकूर यांची अखेर दौंडच्या पोलीस प्रशिक्षण केंद्रात प्राचार्य म्हणून रवानगी करण्यात आली आहे.मागील आठवड्यात त्यांची बीडहून बदली करण्यात आली होती, मात्र त्यांना नियुक्तीच्या प्रतिक्षेत ठेवण्यात आले होते.**

बीडचे माजी पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांची बीड जिल्ह्यातील कारकीर्द वादग्रस्त ठरली.जिल्ह्यात झालेला हिंसाचार,पोलीस दलात वाढलेली लाचखोरी, कायदा सुव्यवस्था राखण्यात पोलिसांना आलेले अपयश या आणि अशा अनेक गोष्टींबद्दल राज्य पातळीवर बीड जिल्हा पोलिसांची प्रतिमा डागाळली होती.घटकप्रमुख म्हणून पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांच्याबद्दल देखील वरिष्ठाकडे देखील नाराजी होती. मागच्या आठवड्यात त्यांची बीड येथून बदली करण्यात आली. त्यांच्या जागी अविनाश बारगळ यांची नियुक्ती करण्यात आली.मात्र ठाकूर यांना नियुक्ती देण्यात आली नव्हती. नंदकुमार ठाकूर हे पुणे येथे नियुक्ती मिळावी यासाठी प्रयत्नशील होते. मात्र पुणे येथील कोणत्याही कार्यकारी पदावर त्यांना नियुक्ती देण्यास खुद्द महासंचालक कार्यालयच अनुकूल नव्हते अशी माहिती आहे. यापार्श्वभूमीवर आता त्यांच्या नियुक्तीचे आदेश आले असून त्यांना दौंडच्या पोलीस प्रशिक्षण महाविद्यालय प्राचार्य म्हणून नेमण्यात आले आहे. ते आता नवीन पोलीस अधिकाऱ्यांना ’पोलिसिंग’ चे धडे देतील.

## पत्रकारांच्या लिखाण स्वातंत्र्यावर गदा आणणारे वादग्रस्त ‘ब्रॉडकास्ट’ विधेयक अखेर सरकारने घेतले मागे !

### मराठी पत्रकार परिषद व देशभरातील तमाम पत्रकार संघटनांच्या दबावामुळे सरकार नरमले

**मुंबई । प्रतिनिधी**

**पत्रकारांच्या लिखाण स्वातंत्र्यवर गदा आणणारे व अतिशय वादग्रस्त ठरलेले ब्रॉडकास्ट विधेयक आज केंद्र सरकारने मागे घेतले सरकारचे हे विधेयक डिजिटल ब्रॉडकास्टर आणि इंडिव्हिज्युअल कॉन्टेट क्रिएटर्सचा आवाज बंद करणार होते. विधेयकातील अनेक तरतुदी डिजिटल मिडियाचा गळा घोटणाऱ्या असल्याने देशभरातील तमाम पत्रकार संघटनां व देशभरातील लाखो पत्रकारांनी या विधेयकास तीव्र विरोध केला होता.**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेनं देखील विधेयकास विरोध करीत आंदोलनाचा इशारा दिला होता. तसे पत्र माहिती मंत्र्यांना पाठविले होते.. अखेर माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी हे विधेयक मागे घेत असल्याचे स्पष्ट केले आहे सर्वांशी चर्चा करून या विधेयकाचा नवा मसुदा तयार करण्यात येईल असे माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी जाहीर केले आहे.अ. भा. मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी सरकारच्या भूमिकेचं स्वागत करतानाच माध्यम स्वातंत्र्यावर अंकुश आणण्याचा कोणताही प्रयत्न देशातील पत्रकार खपवून घेणार नाही असा इशारा दिला आहे. डिजिटल मिडिया सरकार विरोधात असल्याचे आणि जनतेचा नव्या माध्यमाला चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे लक्षात आल्यानंतर डिजिटलवर अंकुश आणण्यासाठी नवे विधेयक आणले गेले होते. मात्र माध्यमांना अंगावर घेऊन चालणार नाही याची जाणीव झाल्यानं सरकारला अखेर माघार घ्यावी लागली आहे.

## जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांच्या विरोधात उपोषण

**जालना । प्रतिनिधी**

**जिल्हा अधिकारी कार्यालयासमोर जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या विरोधात उपोषण सुरू करण्यात आले.लोकसभा निवडणुकीत नियमबाह्य पध्दतीने संगणक, प्रिंटर, लॉपटॉप पुरवित्या सुमुकॉम सिस्टीम एजन्सीवर कार्यवाही करुन काळ्या यादीत टाकावे.**



जालना लोकसभा सार्वत्रिक निवडणूकसाठी भाडेतत्वावर संगणक प्रिंटर, लॅपटॉप प्रशासनाने घेतलेले आहे. मात्र सुमकॉम सिस्टीम या एजन्सीने प्रशासनाची दिशाभुल करुन नियमबाह्य पध्दतीने अनेक नियम पायदळी तुडवले आहेत. २०२१ पुर्वीचे साहित्य नसावे ही प्रमुख अट असून सुध्दा या एजन्सीने १० वर्षापुर्वीचे जुने साहित्य भाडे तत्वावर देतृन प्रशासनाची एका प्रकारे उद्देशपुर्ण फसवणुक केली आहे. शिवाय लहसिल स्तरावरुन या एजन्सीने बील वाढवून घेण्यासाठी अवैद्य मार्गाचा वापर केला आहे. तरी या एजन्सीवर कार्यवाही करुन काळ्या यादीत टाकावे असे अनेकवेळा मा. जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडे तक्रार नोंदविली आहे व वेळोवेळी त्याचा पाठपुरावा केला आहे. तरी जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयाकडून संबंधीत एजन्सी धारकावर व एजन्सीवर कुठल्याच प्रकारची कार्यवाही केलेली नाही. तरी तक्रारदार यांनी दि.०५ जुन २०२४ रोजी उपोषण करण्यात येईल असे सुचविले होते परंतु कुठल्या प्रकारचा पत्रव्यवहार करण्यात आला नाही. त्यामुळे तक्रारदार संतोष तुपसौंदर हे दि.१२/०८/२०२४ वार सोमवार रोजी पासून बेमुदत उपोषणास सुरुवात केली आहे . उपोषण दरम्यान काही अनुचित प्रकार घडल्यास त्याची सर्वस्वी प्रशासनावर राहील याची नोंद घ्यावी. असेही निवेदनात म्हटले आहे.

## नाना पटोलेंच्या नेतृत्वातच काँग्रेस विधानसभा लढवणार

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

आगामी काळात महाराष्ट्रसह हरियाणा, झारखंड आणि जम्मू काश्मीरमध्ये विधानसभेच्या निवडणुका आहेत. या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यांमध्ये संघटनात्मक फेरबदल होणार असल्याच्या चर्चा होत्या. यामध्ये महाराष्ट्रातही काही अंशी संघटनात्मक फेरबदल होण्याच्या चर्चा होत्या. मात्र काँग्रेसमधील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीमध्ये कुठल्याही प्रकारचे संघटनात्मक बदल होणार नाहीत. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या नेतृत्वातच विधानसभा निवडणूक लढवली जाणार आहे. लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाने उत्तम कामगिरी केली आहे.



मंगळवारी दिल्लीत काँग्रेसची सर्व सरचिटणीस, प्रभारी आणि प्रदेशाध्यक्षांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, काँग्रेस नेते राहुल गांधी प्रामुख्याने उपस्थित होते. या बैठकीलामहाराष्ट्र काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले उपस्थित होते. मात्र प्रभारी रमेश चेन्नीथला अनुपस्थित होते. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ पक्ष नेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण असे प्रमुख नेते राज्याचा दौरा करत आहेत. दिल्लीत झालेली काँग्रेसची बैठक आणि महाराष्ट्रात काँग्रेसचा दौरा एकाच दिवशी आल्याने पूर्व सूचना देऊन महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला आजच्या बैठकीला अनुपस्थित होते.

## पान १वरून...

### बीड जिल्ह्यासाठी ४००

विद्यापीठातील शास्त्रज्ञ, हवामान तज्ञ यांची मदत घेऊन विमा कंपनीस पीकविमा देण्यास भाग पाडले. दरम्यान कोणतेही कारण न देता नाकारलेले विमा अर्ज मंजूर करून त्या विमा रक्कमा सुद्धा कंपनीस शेतकऱ्यांना ३१ ऑगस्ट पूर्वी द्याव्या लागणार आहेत.

----------

### वृत्तपत्र विक्रेत्यांना हक्काचा

संपादक दिलीप खिस्ती, सुनील क्षीरसागर, राजेंद्र होळकर, प्रतिभा गणोरकर, सुभाष चौरे, व्यंकटेश वैष्णव, सोमनाथ खताळ, गणेश पठाडे, गणेश मुळे, गिरीश मोहेकर, रवी उबाळे, अक्षय कांकरिया आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, कोरोना काळात कोविड योद्धे म्हणून वृत्तपत्र विक्रेत्यांनी अथकपणे काम केले. नुकतेच बीडमध्ये वृत्तपत्र विक्रेत्यांचे काम करताना अपघाती निधन झाले. त्या घटनेतून धडा घेऊन आपण विमा काढण्याचा निर्णय घेतला. यापूर्वी विक्रेत्यांना रेनकोटचे वाटप केले होते. यापुढेही आवश्यक ते सहकार्य केले जाईल. विमा संरक्षण देणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे, असे मत डॉ.क्षीरसागर यांनी व्यक्त केले. यावेळी बीड जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे संस्थापक सचिव परमेश्वर खरात, अध्यक्ष सुमूर्ती वाघिरे, सचिव विद्याभूषण बेदरकर, कार्याध्यक्ष गणेश भालेकर, कोषाध्यक्ष अमित सासवडे, उपाध्यक्ष प्रतिक भोंडवे, सदस्य अभिनंदन बेदरकर, गणेश घोलप, मधुकर सातपुते, राजेश बाभुळगावकर, डी.एस. कुलकर्णी, श्रीराम जाधव आदींची उपस्थिती होती. प्रास्ताविक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुदाम चव्हाण यांनी केले. सूत्रसंचलन राहुल गिरी यांनी केले. आभार विद्याभूषण बेदरकर यांनी मानले. यावेळी संपादक, पत्रकार, वृत्तपत्र वितरक, विक्रेते उपस्थित होते.

------------

### मलनाथपुर शिवारातील सौर

चोरीला गेलेले दिसले. याची किंमत एकुन २१०५७००/रू आहे. याप्रकरणी सौर ऊर्जा प्लांट चे वरिष्ठ व्यवस्थापक सुधाकर त्रिभुवन शुक्ला यांच्या फिर्यादीवरून शिरसाळा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा रजि. नं.१३०/२०२४ कलम ३०३(२) भा.न्या.स.२०२३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सिरसाळा पोलीस ठाण्याचे सपोनि. गोरक्षनाथ दहिफळे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.ह.सोनवणे हे करीत आहेत.

--------------

### नगराध्यक्षांचा कालावधी अडीचऐवजी

कालावधी अडीच ऐवजी ५ वर्षांचा करण्यात आला आहे. राज्यात अंदाजे १०५ नगर पंचायतच्या निवडणुका अडीच वर्षापूर्वी पार पडल्याने अडीच वर्षासाठी नगराध्यक्षपदावर विराजमान झाले. मात्र, या नगराध्यक्षांचा कालावधी ऑगस्ट महिन्यात संपुष्टात येणार आहे. त्यामुळे नगराध्यक्षपदाची आरक्षण सोडत आतापर्यंत निघणे आवश्यक होते. आता, सरकारने अडीच वर्षांचा कालावधी थेट ५ वर्षांचा करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी दिली आहे. राज्यातील नगरपालिकांच्या नगराध्यक्षांची निवड थेट जनतेतून करण्याचा निर्णय गत महायुती सरकारने घेतला होता. त्यानंतर, महाविकास आघाडी सरकारने हा निर्णय बदलून नगराध्यक्षांची निवड सभागृहातील नगरसेवकांकडून करण्याचा निर्णय घेण्यात आला. सध्या, तो निर्णय लागू असून अडीच वर्षांसाठी नगराध्यक्षपदाची निवड होती, ती आता ५ वर्षे करण्यात आली आहे.

**अनेकांची घोर निराशा**

दरम्यान,महाराष्ट्रात २२८ नगर परिषदा व नगरपंचायती आहेत. त्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये निवडून आलेल्या नगरसेवकांच्या पाच वर्षांच्या कालावधीपैकी अडीच–अडीच वर्षांचे असे दोन अध्यक्ष निवडण्याचे निश्चित करून पहिल्या टप्प्याच्या नगराध्यक्षपदासाठी घेण्यात आलेल्या आरक्षणाच्या सोडतीचा कार्यकाळ संपुष्टात येत आहे. त्यामुळे, आता दुसऱ्या टर्ममधील नगराध्यक्षांची निवड काही दिवसांवर येऊन ठेपली असता नगराध्यक्षांचा कालावधी अडीच वर्षावरून ५ वर्षांवर करण्यात आला आहे. त्यामुळे, नगराध्यक्षपदाची स्वप्ने पाहणाऱ्या नगरसेवकांची घोर निराशा झाली आहे.

------------

### बीड जिल्ह्यात वाढला

काँग्रेसचे राज्य प्रभारी रमेशजी चेन्नीथला व प्रदेशाध्यक्ष आ.नानाभाऊ पटोले यांच्याकडे बीड जिल्ह्यातील काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या शिष्टमंडळाने केली. लातूर – बीड आणि धाराशिव या तीन जिल्ह्यातील काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आढावा बैठक नुकतीच लातूर येथे घेण्यात आली. या बैठकीसाठी बीड जिल्ह्यातून ७०० ते ८०० आजी माजी पदाधिकारी व प्रमुख कार्यकर्त्यांचे शिष्टमंडळ उपस्थित होते. यात एकट्या परळी विधानसभा मतदारसंघातून शंभरहून अधिक वाहनांचा ताफा घेऊन कार्यकर्ते काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांना पक्षाने प्रामुख्याने परळी विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी द्यावी अशी विनंती व मागणी केली. या बैठकीस काँग्रेसचे राज्य प्रभारी रमेशजी चेन्नीथला, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष आ.नानाभाऊ पटोले यांच्या प्रमुख उपस्थितीत व विरोधी पक्षनेते आ.विजय वडेट्टीवार, काँग्रेसचे विधिमंडळ पक्षनेते आ.बाळासाहेब थोरात, काँग्रेसचे विधानपरिषद गटनेते आ.सतेज पाटील, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अल्पसंख्यांक विभागाचे अध्यक्ष आ.वजाहत मिर्जा, माजी मंत्री दिलीपराव देशमुख, माजी मंत्री आ.अमित देशमुख, काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांच्या उपस्थितीत बीड जिल्ह्यातील गेवराई, परळी, बीड, केज विधानसभा काँग्रेस पक्षाने लढवावी अशी प्रामुख्याने मागणी बीड जिल्हा काँग्रेसच्या वतीने करण्यात आली. यावेळी प्रामुख्याने परळी विधानसभेची जागा काँग्रेस पक्षानेच लढवावी अशी आग्रही मागणी यावेळी बीड जिल्ह्यातील काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या शिष्टमंडळाने काँग्रेसचे राज्य प्रभारी रमेशजी चेन्नीथला, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष आ.नानाभाऊ पटोले यांच्याकडे केली. या प्रसंगी बोलताना जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांनी सांगितले की, बीड जिल्ह्यात राष्ट्रीय नेत्या खासदार सौ.रजनीताई पाटील, प्रदेशाध्यक्ष आ.नानाभाऊ पटोले आणि माजी मंत्री अशोकराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाचा जनाधार सातत्याने वाढत आहे. राष्ट्रीय नेते खासदार राहुल गांधी यांच्या भारत जोडो न्याय यात्रेपासून तर काँग्रेस पक्षावर जनतेचा विश्वास वाढला आहे. काँग्रेस पक्षात प्रवेश करण्यासाठी युवा, महिला वर्ग आणि सर्व घटकांतील लोकांचा ओढा दिवसेंदिवस वाढत आहे. यामुळे कार्यकर्त्यांची एक मोठी फळी निर्माण झाली आहे. जिल्ह्यात काँग्रेस पक्षाला पुर्वीपासूनच पोषक व अनुकूल वातावरण आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीच्या उमेदवाराला काँग्रेस कार्यकर्त्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे विजय संपादन करणे सहज शक्य झाले. लोकसभा जिंकण्यासाठी काँग्रेस पक्षाचा मोठा वाटा आहे. तसेच पक्ष बीड, केज व परळी विधानसभा मतदारसंघात ही सातत्याने लक्षणिय कामगिरी करीत आहे. बीड जिल्ह्यातील जनतेला काँग्रेसच्या पंजा या पक्ष चिन्हाचा कधीच विसर पडणार नाही. अशावेळी कार्यकर्त्यांना निवडणूक लढविण्यासाठी जागा व संधी मिळणे आवश्यक आहे. प्रत्येक वेळी बीड जिल्ह्यात काँग्रेस पक्ष आघाडीचा धर्म पाळून राष्ट्रवादीला मदत व सहकार्य करतो. बीड जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर आहेत. जिल्ह्यात पक्षाचे चांगले संघटन ही आहे. मागणी केलेल्या सर्व विधानसभा मतदारसंघावर आपली पकड असून काँग्रेस पक्षाकडून वंचित घटक, मुस्लिम, मराठा आणि बहुजन समाजातील मतदारांना मोठ्या अपेक्षा आहेत. त्यामुळे महाराष्ट्र विधानसभेवर काँग्रेस आणि महाविकास आघाडीचा झेंडा फडकविण्यासाठी बीड जिल्ह्यातील गेवराई, परळी, बीड आणि केज या चार विधानसभा मतदारसंघांपैकी ३ जागा काँग्रेस पक्षाने लढवाव्यात अशी मागणी बीड जिल्हा काँग्रेसच्या वतीने जिल्हाध्यक्ष देशमुख यांनी यावेळी केली. तर याप्रसंगी प्रदेशाध्यक्ष आ.नानाभाऊ पटोले यांनी ही सकारात्मक प्रतिसाद देत काँग्रेस पक्षाचे राज्य प्रभारी रमेशजी चेन्नीथला यांना सांगितले की, मी बीड जिल्ह्यात दोन दौरे केले आहेत. मला जाणवले की, तिथे काँग्रेस पक्ष मजबूत स्थितीत आहे. आज बीड जिल्ह्यात पुर्वी पेक्षाही काँग्रेस पक्ष संघटना ही अधिक बळकट, व्यापक झालेली आहे. हे आजच्या बैठकीसाठी आलेल्या बीड जिल्ह्यातील जंम्बो शिष्टमंडळाच्या उपस्थिती वरूनच दिसून येत आहे. म्हणून महाविकास आघाडीच्या आगामी जागा वाटपामध्ये विधानसभा निवडणुकीत बीड जिल्ह्यात जास्तीत जास्त जागा लढण्यासंदर्भात काँग्रेस पक्ष दावा करणार असल्याचे प्रदेशाध्यक्ष आ.नानाभाऊ पटोले यांनी यावेळी स्पष्ट केले. या आढावा बैठकीत पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी आजी–माजी पदाधिकारी व कार्यकर्त्यांसोबत तपशीलवार, मुद्देसूद संवाद साधला. यावेळी महाविकास आघाडीच्या बीड जिल्ह्यातील सर्वच उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्याचा निर्धार काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष राहुल भैय्या सोनवणे, नवनाथ बापू थोटे, जेष्ठ नेते प्रवीणकुमार शेप, महावीर काका मस्के, परळी शहराध्यक्ष बहादूर भाई, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष ईश्वर शिंदे, परळी तालुकाध्यक्ष प्रा.अनिल जाधव, माजलगाव तालुकाध्यक्ष नारायणराव होके, केज तालुकाध्यक्ष प्रवीण खोडसे, शिरूर तालुकाध्यक्ष रमेश सानप, बीड तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे, गेवराई तालुकाध्यक्ष महेश बेदरे, पाटोदा तालुकाध्यक्ष राहुल जाधव, आष्टी तालुकाध्यक्ष रवी काका ढोबळे, युवक जिल्हाध्यक्ष श्रीनिवास बेद्रे, परळी विधानसभा अध्यक्ष रणजित भैय्या देशमुख, ॲड.प्रकाश मुंडे, अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कांबळे, महिला जिल्हाध्यक्ष मिनाक्षीताई पांडुळे, जिल्हाध्यक्ष विष्णू मस्के, ईश्वर सोनवणे, दत्ताभाऊ गव्हाणे, शिवाजीराव देशमुख, प्रकाशराव देशमुख यांनी व्यक्त केला.

-------------

### राष्ट्रवादीच्या चिन्ह प्रकरणावरील सुनावणी

चार आठवड्यात दाखल करण्यास सांगितले होते, या गोष्टीला जवळपास चार महिने उलटून गेले तरी अजित पवार गटाने उत्तर दाखल केले नव्हते. त्यानंतर ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात अजित पवार गटाने उत्तर दाखल केले आहे. शरद पवार गटानेही अजित पवारांच्या उत्तराला रिजॉईंडर (प्रत्युत्तर) दिले आहे.

------------

### विदर्भ– मराठवाड्यातील दुग्धविकास

मंत्रीमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला. यानंतर विखे यांनी याची माहिती एक्सवर ट्विट करत दिली आहे. यावेळी विखे यांनी, याआधी विदर्भ व मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात ११ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला होता. आता उर्वरीत ८ जिल्ह्यांचा देखील या योजनेत समावेश करण्यात आल्याचे सांगितले. दुग्धविकास प्रकल्पांतून उच्च उत्पादन क्षमता असलेल्या दुधाळ गायी–म्हशी, उच्च दुध उत्पादन क्षमता असलेल्या भृणांचे प्रत्यारोपण केलेल्या कालवडींचे अनुदान तत्वावर वाटप करण्यात येईल. तर या दुग्धविकास प्रकल्पांमुळे मराठवाडा आणि विदर्भात नवी दुधक्रांती येईल. प्रामुख्याने मराठवाडा आणि विदर्भातील शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण कमी असा दावा विखे यांनी केला आहे. तसेच मराठवाडा–विदर्भात आयोजित दुसऱ्या टप्प्यातील प्रकल्प एनडीडीबी आणि मदर डेअरी यांच्या सहकार्याने केले जाणार आहेत. यात विदर्भ आणि मराठवाड्यातील १९ जिल्ह्यांचा समावेश असून नागपूर येथे मदर डेअरी आणि एनडीडीबी एकत्र येऊन ५०० कोटी रूपये खर्चाचा दुध प्रक्रिया प्रकल्प उभा करतील. यामुळे विदर्भ आणि मराठवाडाच्या विकासाला चालना मिळून स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, असा दावा देखील विखे यांनी केला आहे.

--------------

### ...तर ‘लाडकी बहीण’

सुनावले होते. सर्वोच्च न्यायालयाने सरकारला सवाल केला होता की, लाडकी बहीण योजनेसाठी तुमच्याकडे पैसे आहेत, मात्र याचिकाकर्त्यांना मोबदला देण्यासाठी पैसे नाहीत का?

-----------

### जगताप, मुळूक यांच्या नेतृत्वाखाली बीड

ऐतिहासिक प्रवेश सोहळा आहे. बीड जिल्ह्यातून तब्बल दोन हजार महिला भगिनी आणि युवक बारा तासांचा प्रवास करून मुंबईला शिवसेनेत प्रवेश करण्यासाठी आले आहेत ही बाब पक्षाला ऊर्जा देणारी आहे अशी भावना महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष, लोकप्रिय मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्ष मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब यांनी पक्ष प्रवेश सोहळ्या दरम्यान व्यक्त केली. काल दि. १२ ऑगस्ट रोजी हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन तथा महाराष्ट्रा राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खा. डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या नेतृवाखाली सुरु असलेल्या शिवसेनेच्या दमदार अशा कार्यपद्धतीस प्रभावित होऊन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर उबाठा सेनेतील महिला आघाडी जिल्हाप्रमुख तथा राज्य महिला आयोगाच्या सदस्य ॲड. संगीता चव्हाण व सर्व महिला पदाधिकारी, युवासेना जिल्हाप्रमुख ॲड. रवीराज बडे, गजानन कदम आणि त्यांच्या सर्व समर्थक कार्यकर्त्यांनीवर्षा निवास्थान मुंबई येथे महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री, शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि सचिन भैय्या मुळूक यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत प्रवेश केला. या प्रवेश सोहळ्याकरिता बीड जिल्ह्यामधून चारशे गाड्यांचा ताफा मुंबई येथे डेरे दाखल झाला होता. मुख्यमंत्री शिंदे साहेब यांनी या सर्वांचे पक्षात स्वागत करून त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना दे साहेब म्हणाले की, अनिल जगताप यांनी काही महिन्यापूर्वी पहिल्यांदा बीडमधून पाचशे ते सहाशे गाड्यांचा ताफा मुंबईत आणून रात्री दीड वाजता आपला स्वतःचा शिवसेनेत ऐतिहासिक प्रवेश केला तर आता जगताप, मुळूक यांच्या नेतृत्व मार्गदर्शनाखाली बीडमधून मुंबईत दुसऱ्यांदा चारशे गाड्यांचा ताफा रात्री दोन वाजता येऊन शिवसेनेत ऐतिहासिक प्रवेश करत आहे याचे मला कौतुक वाटते. राज्यातील महायुती सरकार हे सर्वसामान्य लोकांसाठी काम करणारे सरकार आहे. गेल्या दोन वर्षात घेतलेला प्रत्येक निर्णय हा सर्वसामान्य माणसाला दिलासा देण्यासाठी घेतला आहे. जिल्ह्यात शिवसेनेला अधिक मजबूत करावे अशी अपेक्षा त्यांनी बीड जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन मुळूक आणि सर्व शिवसैनिकांकडून यावेळी व्यक्त केली. यावेळी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलमताई गोऱ्हे, आमदार भरतशेठ गोगावले, शिवसेना उपनेत्या सौ.कलाताई शिंदे तसेच शिवसेनेचे सर्व प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**बीड शिवसेनेतल्या इनकमिंगमुळे अनिलदादा जगताप यांच्या विधानसभा दावेदारीला बळकटी**

बीड मतदार संघात विधानसभेसाठी यंदा अनिलदादा जगताप यांना मतदारांकडून प्रबळ उमेदवार मानन्यात येत आहे व त्या पद्धतीने अनिलदादा यांचे बीड मतदार संघावर प्रबल्य असल्याचे देखील जाणवत आहे. अनिलदादा जगताप सध्या विधानसभेसाठी कार्यकर्ते आणि मतदारांची बांधणी करत जोरदार तयारीला लागले आहेत. दिवसेंदिवस अनिलदादा यांच्या गोठात बीड मतदार संघातील निष्ठावंत आणि तळमळीच्या कार्यकर्त्यांचा प्रवेश होत आहे. विधानसभेच्या तोंडावर शिवसेनेत कार्यकर्त्यांची वाढत असलेली इनकमिंग अनिलदादा जगताप यांच्या विधानसभा दावेदारीला बळकटी देऊन जात आहे.

**यांनी केला शिवसेनेत प्रवेश**

उबाठा सेनेतील ॲड.संगीता चव्हाण, रविराज बडे, गजानन कदम यांच्यासह अमोल जाधव, सचिन जाधव, कृष्णा सायलो, संकोड (सरपंच), संतोष भाऊ ललवाणी माजलगाव, रमेश सावंत माजलगाव, दिपकचंद्र शेनोरे, दिपक कदम, शैलेश कासार, जगदीश वखरे, अक्षय घल्लाळ, ओम आगलावे, प्रवीण लांडगे, यश लांडगे, सचिन उडान, अमन भालेकर, नाना शिंदे, गणेश उडान, मेघनाथ काळे, आदित्य जाधव, स्वयम्? पवार, अभी तीठे, जयदत्त किरकत, राजेंद्र सानवटे, रामेश्वर किरकट,परशुराम कुटे, विशाल डोंगर, बिभीषण केसकर, अशोक सोनवणे ,राजेभाऊ कराड, संदिप नखाते, शेख फरजाना – उपजिल्हा संघटक, बीउ, इंद्रजीत पांचाळ, गौरव राठोड, बाळसाहेब चव्हाण जमुना साखरे – विधानसभा समन्वयक परळी, काझी रुझद – शहर संघटीका, मनोरमा डोईफोडे – उपजिल्हासंघटक, कविता घोरपडे – विधानसभा समन्वयक, बीड, कावेरी घुले – तालुका संघटक, सुनिता जाधव – शहर संघटक, प्रमील भोसले – लालुका संघटक परळी, योगीता चिंचकर–सहसंघटक मजलगाव, धोंडीराम बाळू जाधव, बाबासाहेब राठोड, सुभाष जाधव, उत्तम जाधव, अनुसया पवार, यमुनाबाई राठोड, सोजरबाई चव्हाण, राज पाटील –उपतालुकाप्रमुख शिरूर यांनी व त्यांच्या हजारो समर्थक कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

cmyk

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार दि. १४ ऑगस्ट २०२४



## पिसाळलेल्या कुत्र्याचा चौघांना चावा; कुत्र्याचा बंदोबस्त करावा

चौसाळा : येथील एका फिरस्त्याा पिसाळल्याल्या कुत्र्याने गावातील जवळपास चार ते पाच जनाला चावल्याने नागरिक भयभीत झाले आहेत या कुत्र्याासह इतर ठिकाणाहून गावात आणून सोडलेल्या तसेच गल्ली बोलातून पाळीव कुत्र्याने नागरिकाला हैराण करून सोडले आहे दरम्यान कुत्र्याचा त्वरित समंधित खात्याने बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिक करतात

चौसाळा तालुका बीड येथील दि १०/८/२०२४ रोजी गावातील एका पिसाळलेल्या कुत्र्याने गल्ली बोलातून फिरून नगरींकाला हैराण करून सोडले तर या कुत्र्याने गावातील व्यवृद्ध महिला साखरबाई परमेश्वर शिंदे यांना तीन ठिकाणी चावा घेतला तर त्याच बरोबर माया गणेश सोनावणे वय ३०वर्ष श्रावण महेश गायकवाड वय वर्ष ४ यांच्यासह इतर दोघांना या कुत्र्याने चावा घेऊन हैराण केले सदर कुत्र्याने चावल्याल्या नागरिकांवर चौसाळा येथील व्यध्यकीय अधिकारी डॉ मोटे यांनी उपचार केला दरम्यान सदर कुत्र्या बरोबर गावातून विशेषतः बसस्टॅण्डवर अश्या फिरस्त्याा कुत्र्याची संख्या अधिकच वाढत आहे तर गल्ली बोला तुन पाळीव कुत्रे ही जाणारे येणारे बाळाला व व्रधाला त्रास देत असल्याने नागरिक वैतागून गेले आहे सदर या कुत्र्याचा समंधित खात्याने त्वरित बंदोबस्त करून नागरिकाला या त्रासातून सूडवावले अन्यथा या फिरस्त्याा कुत्र्याच्या बंदोबससाठी आगळा मार्ग आवलबावं लागेल अशी मागणी व इशारा गावातील युवा कार्यकर्ते प्रवीण भारत शिंदे या कार्यकर्त्यांने दिल आहे.

# बाबासाहेबांमुळे झालेले सामाजिक बदल आणाभाऊंनी साहित्यातून मांडले - प्रा.डॉ.सोमनाथ

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील युवा आंदोलन सामाजिक संघटनेकडून सत्याशोधक डॉ.आण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त मान्यवरांचे प्रबोधनपर व्याख्यान, गुणवंतांचा सत्कार आणि शालेय साहित्या वाटप करण्यात आले. या उपक्रमाचे हे चौथे वर्ष आहे.

रविवार, दिनांक ११ ऑगस्ट रोजी विलासराव देशमुख सभागृह येथे आयोजित या कार्यक्रमास उदघाटक म्हणून उपजिल्हाधिकारी दिपक वजाळे तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी युवा आंदोलन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अशोक पालके तर प्रमुख पाहुणे म्हणून तहसिलदार विलास तरंगे आणि प्रमुख व्याख्याते म्हणून सुप्रसिद्ध साहित्यिक, विचारवंत प्रा.डॉ.सोमनाथ कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रशांत दहिफळे (सरपंच, बागझरी), हनुमंत गायकवाड (माजी सरपंच, तळणी), संतोष नरसिंगे (संचालक, महानिता ग्रुप), धीमंत राष्ट्रपाल (बेटी बचाव अभियान), बळीराम उपाडे (संचालक, स्वरसंध्या ग्रुप), सुंदर खाडे (युवा आंदोलन तालुकाध्यक्ष, केज) आणि आयोजक युवा आंदोलनचे अंबाजोगाई तालुकाध्यक्ष महेश जोगदंड व युवा आंदोलनचे परळी तालुकाध्यक्ष नकेश कांबळे या मान्यवरांची विचारमंचावर प्रमुख उपस्थिती होती. महामानवांना अभिवादन केल्यानंतर उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी बोलताना उपजिल्हाधिकारी दिपक वजाळे यांनी सांगितले की, मुलांनो खूप अभ्यास करा, चांगली तयारी करा, नियोजन करून अभ्यास केला. तर तुम्हाला यशस्वी होण्यापासून कोणीच रोखू शकत नाही. तुम्ही स्वतःच्या गरजा पूर्ण करण्यासाठी स्वतः काम करून शिका निर्व्यसनी रहा, महापुरूषांनी सांगितलेल्या विचारांवर आयुष्याची वाटचाल सुरू ठेवा असे सांगितले. तर प्रमुख वक्ते साहित्यिक, विचारवंत प्रा.डॉ.सोमनाथ कदम यांनी सत्याशोधक आण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याावर बोलताना अंधश्रद्धा, दैववाद, कर्मकांड या बद्दल साहित्याातील विविध दाखले देत विठू महार, चिखलातील कमळ, फकिरा, सापळा आदींसह उदाहरणे दिली.



विश्वरत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक क्रांती, बदल आणि विधायक चळवळीचा सकारात्मक परिणाम जनमाणसांत कसा झाला हे आण्णा भाऊंनी त्यांच्या साहित्याातून मांडला आहे. जाणून बुजून हि व्यवस्था बौद्ध, मातंग यांच्या वाद तेवत ठेवण्याचे काम करीत असते. पण, बीड जिल्ह्यात चळवळ जिवंत आहे. याबद्दल समाधान व्यक्त करून व्याख्यानास अत्यांत प्रबुद्ध असा श्रोतावर्ग उपस्थित आहे. तालुक्याच्या ग्रामीण भागातून आलेल्या २०० हून अधिक लोकांत झालेले परिवर्तन नजरेत भरणारे आहे. मानवी हक्क अभियानचे कर्मवीर एकनाथरावजी आवाड (जिजा) यांनी या भागात जी वैचारिक चळवळ अनेक वर्षे राबविली त्याचे हे फळ म्हटले पाहिजे. असे सांगून श्रोते प्रबुद्ध असले की, अधिक सडेतोड, खुले, व्यापक आणि वास्तव बोलता येते. आण्णा भाऊ यांच्या साहित्याातील परिवर्तनवादी तत्त्वज्ञान, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे गुलामगिरी मुक्तीची चळवळ, मातंग समाजाच्या समाजाच्या मागासलेपणाची कारणे, परिवर्तनाचा पासवर्ड काय ? दलित समाजातील दुभंगतेचे राजकारण, भावनिक सामाजिक व राजकीय चिकित्सा, कोणत्याा गोष्टीची चिड यायला हवी, वर्तमान परिस्थिती आणि असावे लागणारे भान याविषयी प्रा.डॉ.सोमनाथ कदम यांनी अतिशय चिकित्सक व सडेतोड मांडणी केली. उपस्थित सर्वांना कदम यांनी मांडलेले विचार व भूमिका आवडली. या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते सर्व समाजातील गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. ज्यात स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेल्या व विविध पदांसाठी पात्र ठरलेल्यांचा, नेट, सेट पात्रता धारक, इयत्ता दहावी आणि बारावी परीक्षेतील गुणवंत अशा २५ हून अधिक ज्युनिअर ते सिनिअर असणाऱ्या सर्वांचा यथोचित सन्मान व सत्कार करण्यात आला. प्रारंभी बळीराम उपाडे यांनी आपल्या दमदार आवाजात अण्णाभाऊ यांची छक्कड सादर केली. तर अध्यक्षीय समारोप करताना अशोक पालके यांनी गुणवंतांना शुभेच्छा दिल्या, तुमचे खरे आयडॉल हे आई, वडिल, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर व सत्याशोधक आण्णा भाऊ साठे यांच्यासारखे महामानव आहेत. तुम्हाला स्वतःची ओळख निर्माण करायची असेल तर व्हॉट्सअॅप, फेसबुकच्या अभासी दुनियेतून बाजूला या, खूप अभ्यास करा. महापुरूषांचे विचार आत्मसात करा त्यांना फक्त डोक्यावरच नाही तर डोक्यात घ्या असे आवाहन पालके यांनी केले. या प्रसंगी प्रशांत दहिफळे, हनुमंत गायकवाड, धीमंत राष्ट्रपाल यांनी ही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नकेश कांबळे यांनी तर सुत्रसंचलन बळिराम पारसे यांनी केले. उपस्थितांचे आभार महेश जोगदंड यांनी मानले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अविनाश हजारे, रेखा सरवदे, दिलीप पालके, प्रमेश्वर जोगदंड, सुशील हजारे, पिंटू कांबळे, हनुमंत रणदिवे, उत्तम हुलगुंडे व युवा आंदोलनच्या वतीने पुढाकार घेण्यात आला.

## अध्यक्षपदी मोबीनखान पठाण तर उपाध्यक्षपदी अतिकखान पठाण

माजलगाव ( प्रतिनिधी ) तालुक्यातील सोमठाणा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षपदी मोबिनखान पठाण तर उपाध्यक्षपदी अतीकखान पठाण यांची दि १३ ऑगस्ट मंगळवार रोजी निवड करण्यात आली.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोमठाण येथे दि ११ ऑगस्ट मंगळवारी रोजी सकाळी ११:०० वाजता शालेय शिक्षण समिति उर्दू शाळेची निवड प्रक्रिया पार पडली, यामध्ये शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षपदी मोबीनखान पठाण तर



उपाध्यक्षपदी अतिकखान पठाण यांची निवड करण्यात आली.या वेळी सोमठाण ग्रामपंचायतीचे सरपंच बिसमिला खान पठाण, सामाजिक कार्यकर्ते फेरोज खान पठाण अमजद खान पठाण,अफसर खान पठाण,शब्बिर भाई यांच्यासह मुख्याधापक अंसारी मॅडम,नविद सर सर्व वर्गातील शिक्षक गावातील नागरिकांची उपस्थिती होती.

सोमठाणा येथील शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षपदी मोबिन खान हकिमखान पठाण व उपाध्यक्ष पदी अतिक खान यांची निवड झाल्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते फेरोज खान पठाण,अफसर खान पठाण,नदीम कुरेशी,शाकेर भाई यांनी फुलांचा हार घालून सत्कार करण्यात आला व नवनिर्वाचित अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना शुभेच्छा दिल्या.

## तांबाराजुरी येथे कायदेविषयक शिबिर संपन्न

पाटोदा । प्रतिनिधी

दिनांक १३/०८/२०२४ रोजी तांबाराजुरी येथे विधी सेवा समिती पाटोदा व वकिल संघ पाटोदा यांचे संयुक्त विदयमाने स्त्री भ्रूण हत्याा आणि इतर प्रचलित सामाजिक दुष्कृत्यो, पीडित भरपाई योजना, हुंडा आणि जातिभेद ई. कायदे विषयक शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मा.दिवाणी न्यायाधीश पाटोदा श्रीमती एस.एन.निकम मॅडम या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी होत्याा त्यांनी स्त्री भ्रूण हत्याा आणि इतर प्रचलित सामाजिक दुष्कृत्यो या विषयी उपस्थितांना उत्कृष्टरित्याा मार्गदर्शन केले. वकील संघातील विधिज्ञ श्री एस. एन. घुमरे यांनी पीडित भरपाई योजना या विषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच पाटोदा वकील संघाचे विधीज्ञ श्री.एस. बी. कोकाटे यांनी हुंडा आणि जातिभेद बाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. सदर कायदेविषयक शिबिराचे प्रास्ताविक व सूत्र संचालन तसेच सरतेशेवटी सर्वांचे आभार प्रदर्शन विधीज्ञ श्री एस.बी. जावळे यांनी केले. या कार्यक्रमास वकील संघाचे अध्यक्ष विधीज्ञ श्री



एस. एस.कोठेकर साहेब हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. विधीज्ञ श्री एन. जी. जाधव, विधीज्ञ श्री यू.बी.जाधव, विधीज्ञ श्री ए.एस. वैद्य, विधीज्ञ श्री एस.एन.घूमरे,विधीज्ञ श्री एस.बी जावळे,विधीज्ञ श्री एस.बी.थोरवे, विधीज्ञ श्री एस. आर. नागरगोजे, विधीज्ञ महेश बेदरे व पाटोदा वकील संघाचे इतर सदस्य, विस्तार अधिकारी बी एस राख साहेब, गावातील सरपंच ज्योती तांबे मैडम, ग्रामसेवक वाघुले साहेब, तसेच तहसिल कार्यालयातील तलाठी मॅडम श्रीमती भारती दांडगे, गावातील नागरीक या कार्यक्रमास मोठया संख्येने उपस्थित होते.

## पान ६ वरून...

### धानोरा रोड ५० फुटाचा

सुधारणा करणे ता.जि बीड येथील एकूण १७ कामाचा प्रस्ताव सादर केला असून त्यामध्ये पोलीस मुख्यालय ते पालवन चौक धानोरा रोड असून त्यास मा.मुख्य अभियंता सा.बां.प्रादेशिक विभाग छत्रपती संभाजी नगर यांनी तांत्रिक मान्यता दिली आहे. सदरील प्रस्ताव निधी मागणी व प्रशासकीय मान्यता मिळविण्यासाठी नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई याठिकाणी पाठविण्यात आला असून लवकरच मान्यता मिळेल अशी खात्रीलायक माहिती मिळाली असल्याचे वंचितचे अजय सरवदे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### ऊसतोडणी कामगाराचा मुलगा

विकास कामे झालेले आहेत आणखी विकास कामे व रस्त्याची कामे होणार आहेत.स्पर्धा परीक्षेत पास होऊन आपल्या गावाचे नाव मोठे करावे असे आवाहान केले.

यावेळी जामखेडचे पोलीस निरीक्षक महेश पाटील म्हणाले की, गौरव सोहळ्याने इतर विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते.आंधळेवाडीकरांचे कौतुक मानायला हवे कारण या छोट्या गावात अभ्यासिका सुरु केली आहे.याचा तरुणांनी लाभा घ्यावा.नौकरीतील उद्दिष्ट पुर्ण करा, उद्देश स्पष्ट व स्वच्छ ठेवा.जीवनात आनंद व समाधान मिळेल असे सांगीतले. यावेळी देविदास धस म्हणाले की, या आंधळेवाडीतुन आज २० विद्यार्थी स्पर्धा परीक्षा अभ्यास करीत आहेत.या वाडीने इतिहास घडविला आहे.संतोष आंधळे हा अतिसर्वसामान्य कुटुंबातील आहे.जिद्द,चिकटी,मेहनत व परिश्रम याच्या जोरावर संतोष यशस्वी झाला.आईवडील व मोठ्या

भावाची खंबीर साथ प्रेरणा त्याला मिळली आहे असे धस यांनी सांगुन शुभेच्छा दिल्या.यावेळी समाजसेवक विजय गोल्हार, देवीदास धस,महेश पाटील,जामखेड,अमरराजे निंबाळकर, पत्रकार उत्तम बोडखे यांची भाषणे झाली.यावेळी सुत्रसंचलन सोमीनाथ डोंगरे यांनी केले.

### जनसामान्यांसाठी वर्षा

यामध्ये शहरातील छत्रपती शिवाजी महाराज, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे, भारतरत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून मुंबईकडे रवाना झाला. यामध्ये तब्बल दोन हजार महिला भगिणींचा समावेश होता. हा संपुर्ण ताफा मुंबईमध्ये रात्री दोनच्या सुमारास दाखल झाल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते विधान परिषदेच्या उपसभाती निलमताई गोऱ्हे यांच्या प्रमुख उपस्थिती प्रवेश सोहळा वर्षा बंगल्यावर पार पडला. यावेळी उपजिल्हाप्रमुख फर्जना शेख उपजिल्हाप्रमुख शांता राऊत उपजिल्हा मनोरमा डोईफोडे परळी विधानसभा समन्वय जमुना साखरे बीड विधानसभा समन्वयक कविता घोरपडे बीड तालुका संघटक कावेरी घुले शहर संघटक नुज्जत काजी अंबाजोगाई शहर संघटक सुनिता जाधव माजलगाव शहर संघटक योगिता चिंचकर रोहिणी जाधव सारिका जाधव व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपले मत व्यक्त करतांना म्हटले की, आतापर्यंत एकही सवसामान्य नागरिकांना वर्षा बंगल्यावर येवू दिले नसेल मात्र हे सरकार गोरगरिबांचे आणि सर्वसामान्यांचे आहे. यामुळे येथील वर्षा बंगल्याचे दार जनसामान्यांसाठी कायम खुले असल्याचे मत व्यक्त केले. त्याचबरोबर महिला भगिणींच्या पाठीशी एकनाथ शिंदे भाऊ म्हणून कायम उभा असून तुमच्या अडीअडचणी दूर करण्यासाठी नेहमी सज्ज असल्याचे मत व्यक्त केले.

बंजारा नृत्याचे मुख्यमंत्र्यांनी केले कौतुक

अॅड.संगिताताई चव्हाण यांच्याकडून प्रवेशासाठी पारंपारी बंजारा नृत्या हालगी वाद्य सोबत घेवून गेल्या होत्याा. मध्यरात्री मुंबईत दाखल झाल्यानंतर हालगीच्या कडकडाटाने अन बंजारा नृत्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा स्वागत करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्र्यांकडून बंजारा नृत्याचे कौतुक करण्यात आले.

### आष्टीत ज्येष्ठ नागरिकांच्या

नरेंद्र मोदी यांनी हर घर तिरंगा घर घर तिरंगा या उपक्रमांतर्गत केलेल्या आवाहनाला गतवर्षीप्रमाणे याही वर्षी आष्टीकारांनी मोठ्या उत्साहात प्रतिसाद याचाच एक भाग म्हणून शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक मित्र मंडळ तसेच सुरेश धस मित्रमंडळ यांच्यासह तहसील प्रशासन, नगरपंचायत प्रशासन, गटशिक्षणाधिकारी कार्यालय, शहरातील सर्व शाळा तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी यांच्यासह सामाजिक, शैक्षणिक, व्यापारी,आजी माजी त्रिदल संघटना, पोलिस , पत्रकार व विविध क्षेत्रातील हजारो नागरिकांच्या उपस्थितीमध्ये मंगळवार दि.१३ ऑगस्ट रोजी सकाळी १०१ फुट लांबीच्या ध्वज स्तंभावर तिरंगाचे ध्वजारोहण जेष्ठ नागरिकाच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी भारत माता की जय, वंदे मातरम, हर घर तिरंगा घर घर तिरंगा अशा घोषणांचा जयघोष करत संपूर्ण शहर दणाणून गेले होते.

## धनराज काळे याना ''महाश्रेष्ठ उद्योजक-२०२४'' पुरस्कार जाहीर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील मेडिकल व्यवसायाच्या माध्यमातून आपले नाव अवघ्या मराठवाड्यासह महाराष्ट्रभर करणारे युवा उद्योजक धनराज रामकृष्ण काळे यांना टायकूनस ऑफ एशिया या संस्थेच्या वतीने अतिशय प्रतिष्ठेचा मानला जाणारा असा ''महाश्रेष्ठ उद्योजक-२०२४'' हा पुरस्कार नुकताच जाहीर झाला आहे. या पुरस्काराचे वितरण पुणे येथे १८ ऑगस्ट रविवार रोजी सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये केले जाणार आहे.

मागील पंधरा वर्षांपासून अंबाजोगाई शहरात अरुण मेडिकोजच्या माध्यमातून औषध व्यवसायात धनराज काळे यांनी आपले स्थान निर्माण केले आहे. अतिशय अल्पावधीतच धनराज यांनी आपला



व्यवसाय केवळ अंबाजोगाई शहरपूरताच मर्यादित न ठेवता संपूर्ण बीड जिल्ह्यात पसरविला. त्यानंतर लातूर, धाराशिव व परभणी जिल्ह्यात देखील आपला औषधी व्यवसाय पसरविला.आज या व्यवसायाच्या माध्यमातून वीस ते पंचवीस तरुण बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध होऊन धनराज काळे यांच्यामुळे त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो आहे.

## अध्यात्माला विज्ञानाची जोड असणे आवश्यक -अतुल मुळे

पाटोदा । प्रतिनिधी

आत्मा व परमात्म्याची सांगड घालून आत्म्याला उच्च स्तरावर घेऊन जाते ते अध्यात्म आणि निरीक्षणावर आधारित ज्ञान म्हणजे विज्ञान होय. अध्यात्माला विज्ञानाची जोड असेल तर मानवी जीवनाला भरारी घेण्याची नवी दिशा लाभते, असे प्रतिपादन खोकरमोहा जि.प. माध्यमिक शाळेतील विज्ञान विषयाचे शिक्षक अतुल मुळे यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या कर्मचारी कल्याण समिती व गणित विभागाच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि.९) आयोजित उद्बोधनपर व्याख्यानात ते अतिथी व्याख्याता म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. व्यासपीठावर उपप्राचार्य प्रोफेसर सतिश माउलगे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य नामदेव चांगण उपस्थित होते. अतिथी व्याख्यात्यांचा परिचय डॉ. अशोक नाईक यांनी करून दिला.

विज्ञान व अध्यात्म या विषयावरील आपल्या व्याख्यानात अतुल मुळे पुढे म्हणाले कि, भारताने संपूर्ण विश्वाला अध्यात्माचे ज्ञान दिले आहे. सर्व धर्मग्रंथ विज्ञानवादी असून ते माणसाला प्रथम महत्व देतात. धर्मांचे पालन करताना श्रद्धा बाळगावी पण अंधश्रद्धेला थारा देऊ नये. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य प्रोफेसर हांगे म्हणाले कि, शिक्षकांनी विज्ञान व अध्यात्माची सांगड घालून अध्यापन कार्य केले पाहिजे त्याातूनच प्रगल्भ विचारांचे विद्यार्थी घडू शकतील. सूत्रसंचालन डॉ. शरद पवार यांनी केले. आभार डॉ. अशोक नागरगोजे यांनी मानले. कार्यक्रमास प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## पंतप्रधान, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री यांच्याकडे मागणी करूनही रस्ता होईना

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

तालुक्यातील बीड - अहिल्यानगर महामार्गापासुन ५ कि.मी अतरांवरील कऱ्हेवडगाव या १८०० लोकसंख्या असलेल्या गावातील नागरिकांना जाण्या - येण्यासाठी कच्चा अथवा पक्का रस्ता नसल्यामुळे नाहक त्रास सहन करावा लागत आहे सदरील ठिकाणी डांबरीकरण रस्ता करण्यात यावा यासाठी देशाच्या पंतप्रधानांसह राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री, सदरील विभागाचे मंत्री यांच्याकडे मागणी करूनही रस्ताचा प्रश्न मार्गी लागत नसल्याने देशाच्या स्वातंत्र्या दिनाच्या दिवशी (१५ऑगस्ट) कऱ्हेवडगाव येथील युवक रस्त्याावर पाणी साचलेल्या खड्ड्यात बसून अर्ध नग्न आंदोलन करणार आहेत.

याबाबत सदरील दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, गांधणवाडी-आंधळेवाडी फाटा ( ५६१ ) ते नागरगोजे वस्ती-सांडवावस्ती-आठेगावपुठा, या वस्त्याा गाव अथवा इतर कोणत्याही मुख्य रस्त्याला अद्याप पर्यंत कच्च्या अथवा पक्क्या रस्त्याने जोडण्यात आलेल्या नाहीत



### स्वतंत्र्यदिनी कऱ्हेवडगाव येथे युवकांचे अर्ध नग्न आंदोलन

येथील नागरिकांना गावाकडे अथवा इतरत्र जाण्या येण्यासाठी रस्ता उपलब्ध नसल्यामुळे मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे. कऱ्हेवडगाव गांधणवाडी-आंधळेवाडी फाटा ( ५६१) ते नागरगोजे वस्ती सांडवावस्ती-आठेगावपुठठा- कऱ्हेवडगाव (अंदाजे ५कि.मी) या रस्त्याच्या डांबरीकरणासाठी कऱ्हेवडगावमधील ग्रामस्थ अनेक वर्षापासून पाठपुरावा करत आहेत. काही दिवसांपूर्वीच सदरील रस्त्याच्या डांबरीकरणासाठी ग्रामस्थांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निवेदनाद्वारे विनंती केलेली आहे. देश स्वतंत्र होऊन जवळपास ७५ वर्षे झाली. अद्याप नागरिकांना रस्त्याची सोय झालेली नाही.याविषयीचे सविस्तर निवेदन पंतप्रधान, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. यासाठी सर्वतोपरी पाठपुरावा करून देखील रस्ता होत नसल्यामुळे अखेर दि. १५रोजी सकाळी ११.००वाजता आंदोलन करण्यात येणार आहे.

### ७० वर्षात डांबर पाहायला मिळाले नाही

कऱ्हेवडगाव येथे १९७२ साली साठवण तलावासाठी क्षेत्र अधिग्रहण झाल्याने वडिलोपार्जित घर सोडून स्थलांतरित झालोत. आमच्या बाप जाद्याने रस्त्याचे स्वप्न पाहिले होते.आमची पिडी गेली आता आमच्या नातवाची पिडी चालली आहे. मायबाप सरकारने रस्त्याचा प्रश्न मार्गी लावावा ही ग्रामस्थांची मागणी आहे.

विठ्ठल नागरगोजे,
ग्रामस्थ कऱ्हेवडगाव

Daily Rajya Loktantra Date_14-08-2024

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY NAME
OLD NAME - **ANANT LUXMANRAO KHETRE**
NEW NAME - **ANANT LAKSHMAN KHETRE**
ADDRESS - LAKSHMAN KHETRE, AT POST WAHEGAON (AMLA), BID (RURAL), BEED, MAHARASHTRA - 431122

Daily Rajya Loktantra Date_14-08-2024

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY NAME
OLD NAME - **MEENAKSHI ANANT KHETRE**
NEW NAME – **MEENA ANANT KHETRE**
ADDRESS - ANANT KHETRE, AT POST WAHEGAON (AMLA), BID (RURAL), BEED, MAHARASHTRA - 431122

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
बुधवार दि.१३ ऑगस्ट २०२४
४

# अटल सेतूवरून मच्छिमार संघटना उच्च न्यायालयात

## नुकसान भरपाई देण्याची मागणी

मुंबई : अटल सेतूमुळे मासेमारीवर परिणाम झाला असून उत्पन्नात तब्बल ६० टक्के घट झाल्याचा आरोप वाशी खाडीतील मच्छिमार संघटनांनी केला आहे. यावरून मच्छिमार संघटनांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली असून सरकारने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी केली आहे. यावरून सरकारसमोर नवा पेच निर्माण झाला असून पुढील सुनावणी येत्या २८ ऑगस्टला होणार आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, अंतर आणि इंधनाच्या बचतीसह मुंबईला नवी मुंबईशी जोडण्यासाठी अटल सेतूच्या उभारणीचे काम राज्य सरकारने २०१८ मध्ये हाती घेतले होते. त्याप्रमाणे अटल सेतूचे काम पूर्ण झाले असून काहीच मिनिटातच नवी मुंबईतून मुंबईत प्रवेश करता येतं. मात्र यामुळे मच्छिमारांच्या उपजीविकेवर मोठा परिणाम झाला आहे. याबाबत मरी आई मच्छिमार सहकारी संस्थेने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. तसेच अटल सेतूमुळे मासेमारीवर परिणाम झाला असून उत्पन्नात ६० टक्के घट झाली आहे. त्यामुळे सरकारने वाशी खाडीतील मच्छिमारांना नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी याचिकेतून करण्यात आली आहे. या याचिकेची सुनावणी न्यायमूर्ती बी.पी.



कुलाबावाला आणि न्यायमूर्ती फिरदोश पुनावाला यांच्या खंडपीठासमोर २८ ऑगस्टला होणार आहे. मरी आई मच्छिमार सहकारी संस्थेने दाखल केलेल्या या याचिकेत, अटल सेतूच्या २१.८ किमी पुलाचे काम २०१८ मध्ये सुरू झाले. तेव्हापासून वाशी खाडीवर अवलंबून असणाऱ्या अटल सेतू जवळील कोळीवाड्यांसह वाशीगाव, कोपरखैराणे, घणसोली, जुहूगाव, गोठीवली, दिवा व बेलापूर येथील कोळीवाड्यांच्या उत्पन्नावर झाला. अटल सेतूच्या बांधकामांमुळे येथील मच्छी कमी होत गेल्याने येथील मच्छिमारांचे सुमारे ६० टक्के उत्पन्न घटले. याबाबत मच्छ विभागाने देखील कबूली दिली होती. तर नुकसानभरपाई देण्याबाबत सांगितले होते. मात्र नुकसानभरपाई देताना सरकारने फक्त अटल सेतूच्याजवळ असलेल्या कोळीवाड्यांच विचार केला. पण वाशीगाव, कोपरखैराणे, घणसोली, जुहूगाव, गोठीवली, दिवा व बेलापूर येथील कोळीवाड्यांचा विचार सरकारने केला नाही, असा दावा याचिकेतून करण्यात आला आहे. तसेच ज्याप्रमाणे अटल सेतूच्याजवळील कोळीवाड्यांना नुकसानभरपाई देण्यात आली. त्याप्रमाणे वाशीगाव, कोपरखैराणे, घणसोली, जुहूगाव, गोठीवली, दिवा व बेलापूर येथील कोळीवाड्यांतील मच्छिमारांना नुकसानभरपाई सरकारने द्यावी, यासाठी न्यायालयाने सरकारला आदेश द्यावेत अशी मागणी याचिकेतून करण्यात आली आहे. तर फक्त अटल सेतूच्याजवळील कोळीवाड्यांना नुकसानभरपाई देऊन संविधानानं दिलेल्या समानतेच्या अधिकारावरच गदा सरकारने आणून आमच्यावर अन्याय केल्याचा आरोपही या याचिकेतून करण्यात आला आहे.

## राज्यात तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता



पुणे : मागील आठवड्यापासून राज्यातील बहुतांश भागात पावसाचा जोर ओसरला आहे. राज्यात पुढील पाच दिवस पाऊस उघडीप देण्याचा अंदाज हवामानशास्त्र विभागाने वर्तवला आहे. तर राज्यातील काही भागात हलक्या सरी हजेरी लावण्याची शक्यता हवामानशस्त्र विभागाने वर्तवली आहे. तर उन्हाचा चटकाही काहसा वाढला आहे.

राज्यात पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक अहमदनगर, कोल्हापूर, सातारा, छत्रपती संभाजी नगर, जालना जिल्ह्यातील तुरळक ठिकाणी हलक्या पावसाचा अंदाज आहे. शुक्रवारपर्यंत बहुतांश भागात पाऊस उघडीप देण्याची शक्यता आहे. तसेच शनिवारी मात्र मराठवाड्यातील नांदेड, लातूर, धाराशिव, तसेच मध्यमहाराष्ट्रातील सोलापूर आणि सांगली जिल्ह्यात काही ठिकाणी पावसाचा येलो अलर्ट हवामानशास्त्र विभागाने दिला आहे. राज्यात पावसाने उघडीप दिल्याने उन्हाचा चटका काहीसा जाणवू लागला आहे. शेती कामांनाही वेग आला आहे. बहुतांश भागात खुरपणी फवारणीची कामे शेतकरी करत आहेत. मागील आठवडाभर राज्यातील विविध भागात पावसाने हजेरी लावली होती. तर काही भागात ढगाळ वातावरण होतं. त्यामुळं पिकांवर कीड-रोगांचा प्रादुर्भाव झाला. परंतु आता पावसानं उघडीप दिल्यानं शेती कामांना वेग आला आहे.




### महत्वाच्या घटना

१६६० : मुघल फौजांनी संग्रामगड (चाकणचा किल्ला) ताब्यात घेतला.
१८६२ : कलकत्ता उच्च न्यायालयाची स्थापना
१८६२ : मुंबई उच्च न्यायालयाची स्थापना
१८९३ : मोटर वाहनांची नोंदणी सुरू करणारा फ्रान्स हा पहिला देश बनला.
१९४३ : नागपूर विद्यापीठाने स्वातंत्र्यवीर सावरकर यांना सन्माननीय डी. लिट. पदवी दिली.
१९४५ : दोन अणुबाँबच्या भयावर संहारामुळे जपानने शरणागती पत्करली आणि दुसऱ्या महायुद्धाचा शेवट झाला.
१९४७ : भारताच्या घटनासमितीने सत्ता स्वीकारण्याचा ठराव मंजूर केला आणि लॉर्ड माऊंटबॅटन यांची स्वतंत्र भारताचे पहिले गव्हर्नर जनरल म्हणून नेमणूक केली.
१९४७ : पाकिस्तानला (युनायटेड किंग्डमपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९५८ : 'एअर इंडिया'ची दिल्ली  मॉस्को विमानसेवा सुरू झाली.
१९७१ : बहारीनला (युनायटेड किंग्डमपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
२००६ : श्रीलंकेच्या वायुदलाने केलेल्या बॉम्बहल्ल्यात चेन्चोलाई येथे ६१ तामिळ मुली ठार झाल्या.
२०१० : पहिल्या 'युवा ऑलिम्पिक स्पर्धा' सिंगापूरमधे घेण्यात आल्या.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७७७ : हान्स क्रिस्टियन ओरस्टेड  डॅनिश भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: ९ मार्च १८५१)
१९०० : महाराष्ट्रीयन ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी,पत्रकार, अभ्यासक आणि वक्ते एस. के. पाटील यांचा जन्मदिन.
१९०७ : गोदावरी परुळेकर  मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्या, सामाजिक कार्यकर्त्या व लेखिका. महाराष्ट्रातील पहिल्या स्त्री वकील म्हणून त्यांनी सनद मिळवली. तलासरी, डहाणू, शिरगाव या भागातील डोंगरदर्यांत फिरून वारल्यांच्या पिळवणुकीचे अनुभव त्यांनी ऐकले व आदिवासींमधे जागृतीचे कार्य केले. 'जेव्हा माणूस जागा होतो' हे त्यांचे पुस्तक वेगळ्या जगाची ओळख करुन देणारे आहे. (मृत्यू: ८ आक्टोबर १९९६)
१९११ : वेदतिरी महाऋषी  भारतीय तत्त्वज्ञानी (मृत्यू:)
१९२३ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय पत्रकार, सिंडिकेटेड स्तंभलेखक, मानवाधिकार कार्यकर्ते, लेखक आणि युनायटेड किंगडमचे माजी उच्चायुक्त कुलदीप नायर यांचा जन्मदिन.
१९२५ : जयवंत दळवी  साहित्यिक, नाटककार व पत्रकार. कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, विनोदी लेख असे विविध प्रकार त्यांनी हाताळले. ते 'ठणठणपाळ' या टोपणनावाने विनोदी व मार्मिक लेखन करीत. (मृत्यू: १६ सप्टेंबर १९९४)
१९५७ : जॉन प्रकाश राव जनुमला ऊर्फ 'जॉनी लीवर' विनोदी अभिनेता
१९६२ : रमीझ राजा  पाकिस्तानी क्रिकेटपटू व समालोचक
१९६८ : प्रवीण आम्रे  क्रिकेटपटू

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९५८ : जीन फ्रेडरिक जोलिओट  मूलद्रव्याच्या समस्थानिकांच्या शोधाबद्दल नोबेल पारितोषिक (१९३५) मिळवणारा फ्रेन्च पदार्थवैज्ञानिक (जन्म: १९ मार्च १९००)
१९८४ : कुस्तीगीर खाशाबा दादासाहेब जाधव  १९५२ च्या हेलसिंकी ऑलिम्पिकमधे वैयक्तिक पदक मिळवणारे पहिले भारतीय, शिवछत्रपती पुरस्कार मरणोत्तर (जन्म: १५ जानेवारी १९२६)
१९८८ : एन्झो फेरारी  रेस कार निर्माते आणि ड्रायव्हर (जन्म: १८ फेब्रुवारी १८९८)
२०११ : शम्मी कपूर  हिन्दी चित्रपट अभिनेता व निर्माता (जन्म: २१ आक्टोबर १९३१)
२०१२ : विलासराव देशमुख  महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि केंद्रीय अवजड उद्योग मंत्री (जन्म: २६ मे १९४५)
२०१७ : प्रसिद्ध भारतीय कवी व साहित्यकार चंद्रकांत देवताले यांचे निधन.

## जांभळा बटाटा देतोय चांगले उत्पादन जाणून घ्या वैशिष्ट्ये



आता सेंट्रल बटाटा संशोधन संस्थेने 'कुफरी जामुनिया' ही जांभळ्या बटाट्याची अद्भूत जात विकसित केलेली आहे. विशेषत: भारतीय हवामानासाठी विकसित केलेली जांभळ्या रंगाच्या बटाट्याची ही पहिलीच जात आहे. कुफरी जामुनिया ही बटाट्याची जात अद्वितीय वैशिष्ट्यांसाठी आणि फायद्यांसाठी वेगळी ठरत आहे. भारतात उपलब्ध असलेल्या बटाट्याच्या जातींमध्ये ही मौल्यवान भर आहे.

कुफरी जामुनियाची प्रमुख वैशिष्ट्ये : कुफरी जामुनिया ही एक मध्यम कालावधीत परिपक्व होणारी जात असून, लागवडीपासून काढणीपर्यंत सुमारे ९० दिवसांचा कालावधी लागतो. कमी कालावधीचे पीक फेरपालट करू पाहणाऱ्या शेतकऱ्यांसाठी हा एक चांगला पर्याय आहे. ही जात बायोफोर्टिफाइड आहे, म्हणजे त्यात वाढीव पोषक घटक आहेत. विशेषत: कुफरी जामुनियामध्ये अँथोसायनिन्सचे प्रमाण जास्त असते, जे शक्तिशाली अँटिऑक्सिडंट्स आहेत. हे एक उच्च उत्पादन देणारे वाण आहे, ज्याचे सरासरी उत्पादन ३२०-३५० क्विंटल प्रति हेक्टर आहे. कुफरी जमुनियाचे कंद गडद जांभळे आणि आकाराने आयताकृती असतात. जांभळ्या रंगामुळे हा बटाटा दिसायला आकर्षक तर आहेच त्यातील समृद्ध अँथोसायनिन हे अँटिऑक्सिडंट्स सुद्धा दर्शविते. कुफरी जामुनियाचा एक उल्लेखनीय फायदा म्हणजे सभोवतालच्या परिस्थितीत त्याची उत्कृष्ट साठवण क्षमता. या बटाट्याची गुणवत्ता राखून जास्त काळ साठवण करता येते. ज्यामुळे ते घरगुती वापरासाठी आणि व्यावसायिक उत्पादनासाठी उपयुक्त आहे.

कोणत्या भागात लागवड करता येते? : भारतातील उत्तर, मध्य आणि पूर्व मैदानी भागात लागवडीसाठी कुफरी जामुनियाची शिफारस केली जाते. या प्रदेशांमध्ये त्याची अनुकूलता या भागातील शेतकऱ्यांसाठी या बटाट्याला एक बहुमुखी पर्याय बनवते. 'कुफरी जामुनिया' बटाटा संशोधनातील महत्त्वपूर्ण प्रगती आहे. या बटाट्याचा अनोखा जांभळा रंग, बायोफोर्टिफाइड पौष्टिक फायदे, उच्च उत्पादन आणि चांगली साठवण क्षमता यामुळे शेतकरी आणि ग्राहकांसाठी ही एक उत्कृष्ट निवड आहे. सेंट्रल बटाटा संशोधन संस्थेने विकसित केलेली ही जात भारताच्या कृषी क्षेत्रामध्ये ठसा उमटवणार आहे.

## उच्च उत्पादन आणि गुणवत्ता असलेली पेरुची सुधारित जात 'अर्का पूर्णा'

अर्का पूर्णा ही बेंगळुरू मधून संशोधित आणि विकसित केलेली एक विशिष्ट पेरूची जात आहे. उच्च उत्पन्न आणि उत्कृष्ट गुणवत्तेसाठी ओळखल्या जाणाऱ्या या पेरुचा वापर खाण्यासाठी आणि प्रक्रिया या दोन्हीसाठी करता येतो. मध्यम जोमदार वाढ आणि विपुल फळधारणा या वैशिष्ट्यांसाठी ही जात ओळखली जाते. ज्यामुळे विविध राज्यांमधील पेरू-उत्पादक प्रदेशांमध्ये मध्यम ते उच्च-घनतेच्या लागवडीसाठी ही आदर्श जात आहे.

अर्का पूर्णा पेरूच्या झाडाची वैशिष्ट्ये : अर्का पूर्णा पेरुची झाडे मध्यम जोमदार वाढ दर्शवितात, त्यामुळे मध्यम ते उच्च-घनता लागवडीसाठी योग्य आहे. हे वाण वर्षभर फळधारणा आणि जास्त उत्पादन यासाठी ओळखले जाते. अर्का पूर्णा पेरुची फळे गो आकाराची आणि मध्यम ते मोठ्या आकाराची असून सामान्यत: २०० ते २३० ग्रॅम वजनाची असतात. फळाची बाह्य त्वचा गुळगुळीत आणि चमकदार असते, ज्यामुळे दिसण्यास आकर्षक असतात. अर्का पूर्णा पेरुचा गर घट्ट, पांढरा रंगाचा, जाड असून त्याची टिकवण क्षमता जास्त असल्यामुळे हाताळण्यास सोपे आहे. या पेरुला उत्कृष्ट चव असून १०-१२ ब्रिक्स दरम्यान गोडवा आहे. पेरुची ही जात एस्कॉर्बिक ऍसिडने (व्हिटॅमिन सी) समृद्ध आहे. १९० ते १९८ मिलीग्रॅम/ १०० ग्रॅम फळांचा लगदा आहे. अर्का पूर्णा पेरूमध्ये सामान्यत: मध्यम-मऊ बिया असतात, ज्यामुळे ते वापरण्यासाठी आणि प्रक्रियेसाठी सोयीस्कर ठरतात.

अर्का पूर्णा पेरूची दुहेरी उपयोगिता वैशिष्ट्ये : फळाची उत्कृष्ट चव आणि पोत यामुळे हे फळ खाण्यासाठी आणि पदार्थांच्या निर्मितीसाठी योग्य आहे. हे फळ विविध प्रक्रिया करण्यासाठी देखील योग्य आहे. अर्का पूर्णा पेरूची लागवड खरीप आणि रब्बी दोन्ही हंगामात केली जाते, ज्यामुळे वर्षभर उपलब्धता आणि उत्पादकता सुनिश्चित करते. ही जात पेरू-उत्पादक राज्यांमध्ये लागवडीसाठी योग्य आहे, या प्रदेशांमध्ये प्रचलित हवामान आणि माती प्रकार यांचा फायदा होतो. उच्च उत्पादन , उत्कृष्ट फळ गुणवत्ता आणि वापर आणि प्रक्रिया या दोन्ही हेतूसाठी अर्का पूर्णा ही पेरूची जात सुयोग्य आहे. चांगली वाढ, पेरूचे पौष्टिक फायदे आणि आकर्षकपणा यामुळे पेरू-उत्पादक प्रदेशांमध्ये शेतकरी आणि ग्राहक हे या पेरुला पसंती दर्शवितात. उच्च उत्पादन आणि गुणवत्ता देणाऱ्या पेरूची लागवड करण्यात स्वारस्य असलेल्या शेतकऱ्यांसाठी अर्का पूर्णा ही पेरूची उत्कृष्ट जात आहे.





## गुलाबी बोंडअळीचे एकात्मिक व्यवस्थापन

सद्य:स्थितीमध्ये कापूस पिकावर गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. पीक फूल अवस्थेमध्ये असताना प्रादुर्भावग्रस्त डोमकळ्या किंवा अर्धवट उमललेली फुले आढळून येत आहेत. त्यासाठी गुलाबी बोंड अळी प्रादुर्भावग्रस्त डोमकळ्या किंवा अर्धवट उमललेली फुले वेळीच ओळखून नष्ट करणे अत्यंत आवश्यक आहे. नियंत्रणासाठी गुलाबी बोंड अळीचा जीवनक्रम, नुकसानीचा प्रकार माहिती असणे गरजेचे आहे. जेणेकरून योग्य उपाययोजना त्वरीत करणे शक्य होते.

नुकसानीचा प्रकार व लक्षणे : अंड्यातून निघालेली अली रंगाने पांढरी, तर पूर्ण वाढलेली अळी गुलाबी रंगाची असते. अळी फुले व हिरव्या बोंडाचे नुकसान करते. अळीचा प्रादुर्भाव ज्या फुलांमध्ये होतो, ती फुले अर्धवट उमललेल्या गुलाबाच्या कळीसारखी दिसतात. म्हणून त्यांना 'डोमअळी' असे म्हणतात. अळीचा प्रादुर्भाव कोवळ्या बोंडामध्ये जास्त आढळून येतो. अंड्यामधून निघालेली अळी बोंडात शिरल्यानंतर छिद्र बंद करून टाकते. त्यामुळे बोंडाचे वरील बाजूने निरीक्षण करूनदेखील अळीचा प्रादुर्भाव



ओळखता येत नाही. अळी अवस्था बोंडामध्येच पूर्ण होते. पुढे कोषावस्थेत जाण्यासाठी अळी बोंडाला छिद्र पाडून बाहेर पडते. प्रादुर्भावग्रस्त बोंडे परिपक्व न होताच फुटतात, त्यामुळे कापसाची पोत बिघडते. गुलाबी बोंडअळी बोंडात राहून सरकीचे सुद्धा मोठ्या प्रमाणात नुकसान करते. त्यामुळे बियाण्याची उगवणशक्तीवर विपरीत परिणाम होऊन तेलाच्या प्रमाणात घट येते.

एकात्मिक नियंत्रण : माती परिक्षण अहवालानुसार रासायनिक खतांचा संतुलित वापर करावा. नत्रयुक्त खतांचा जास्त वापर करणे टाळावे. शेतामध्ये पक्ष्यांना बसण्यासाठी हेक्टरी किमान दहा पक्षिथांबे उभारावेत. बोंडअळीग्रस्त फुले किंवा डोमकळ्या तोडून अळीसह नष्ट कराव्यात. सर्वेक्षणासाठी हेक्टरी ४ ते ५ फेरोमोन (कामगंध) सापळे लावावेत. सापळे पिकाच्या उंचीपेक्षा एक ते दीड फूट उंचीवर लावावेत. दोन सापळ्यांमधील अंतर ५० मीटर ठेवावे. बोंडअळीचा प्रादुर्भाव दिसून येताच, ५ टक्के निंबोळी अर्क किंवा अझाडिरेक्टीन (१५०० पीपीएम) ५० मिलि प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. सापळ्यात अडकलेले पतंग वेळच्या वेळी नष्ट करावेत. कापूस पीक पाते व फुलधारणा अवस्थेत असताना किंवा प्रादुर्भावग्रस्त डोमकळ्या पिकावर दिसू लागताच,

ट्रायकोग्रॅमाटॉयडीया बॅक्ट्री या परोपजीवी मित्र कीटकाची १ लक्ष अंडी प्रति हेक्टर या प्रमाणात ४ ते ५ वेळा दर सात दिवसांच्या अंतराने प्रसारण करावेत.

# कार्यकर्त्यांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही : डॉ.योगेश क्षीरसागर

## वैभव सोनवणे यांच्यासह कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील जुन्या कार्यकर्त्यांची नव्यांसोबत सांगड घालणे गरजेचे आहे. जे भटकले होते, त्यांना चांगल्या मार्गावर आणणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. माझ्यावर विश्वास दाखवून पक्षात आलेल्या कार्यकर्त्यांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही, अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली.बीडमध्ये सभागृहात मंगळवारी (दि.१३) पालवन चौक परिसराचे युवा नेते वैभव सोनवणे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी अध्यक्षस्थानावरून डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते.



व्यासपीठावर माजी नगरसेवक सय्यद इलियास, सरपंच अमोल बागलाने, लिगल सेलचे जिल्हाध्यक्ष ॲड.नागेश तांबारे, डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ.रमेश शिंदे, बहुजन परिषदेचे जिल्हाध्यक्ष विनोद हातागळे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या विद्यार्थी आघाडीचे शहर जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे, सामाजिक न्याय विभागाचे तालुकाध्यक्ष बबन वाघमारे, तालुका उपाध्यक्ष मिलिंद ठोकळ, तालुका उपाध्यक्ष गोरख काळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे अल्पसंख्याक शहराध्यक्ष माजेद कुरेशी, गजानन जवकर, साजिद जागीरदार, सचिन बहिरवाळ आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात बीड मतदारसंघात वाटचाल सुरू आहे. बीडचे लोकप्रतिनिधी सत्तेत असताना काहीही करू शकले नाहीत. अनेक कामे कागदावर झाली तर काही दर्जाहीन झाली. विशेष असा एखादा प्रकल्प बीडचे लोकप्रतिनिधी आणू शकले नाहीत, असा आरोप त्यांनी केला. पुढे ते म्हणाले की, बीड विधानसभा मतदारसंघात असलेल्या इच्छुकांपैकी आपले संघटन सर्वात मजबूत आहे. त्यामुळे आपल्याला संधी मिळाल्यास विजय कुणीही रोखू शकत नाही. आपण आरोग्य शिबीर, स्वयंरोजगार मेळाव्यातून शेकडो लोकांना लाभ देत आहोत. कार्यकर्त्यांनी देखील लोकांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्न करावेत. जिथे अडचण येईल, ते प्रश्न सोडविण्यासाठी आपण कटिबध्द आहे. नव्याने पक्षात येणाऱ्या कार्यकर्त्यांच्या कार्याची दखल घेतली जाईल. येत्या काळात आपली साथ मोलाची ठरणार आहे, असेही ते म्हणाले. प्रास्ताविक बबन वाघमारे यांनी केले. सूत्रसंचलन प्रा.पांडुरंग सुतार यांनी केले. आभार ज्येष्ठ नेते अशोक सोनवणे यांनी मानले. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ई-पिक पाहणीची अट रद्द करुन सरसकट शेतकऱ्यांना अनुदान द्या- मयुरी खेडकर

गेवराई । प्रतिनिधी



राज्य सरकारने गतवर्षीच्या कापुस तसेच सोयाबीन या पिकांसाठी हेक्टरी ५ हजार भावांतर अनुदान जाहिर केले आहे. मात्र या अनुदान वाटपामध्ये ई-पिक पाहणीची अट असल्याने गेवराई तालुक्यातील तब्बल ७० टक्के शेतकरी या आनुदानापासुन वंचित राहणार आहेत. बहुतांश शेतकरी वर्गाला ई-पिक पाहणी हे माहिती सुध्दा नाही. तसेच ई-पिक पाहणी करताना शेतकऱ्यांना तांत्रिक आडचणी देखील येत असल्याने ई-पिक पाहणी आपलोड झालेली नाही. त्यामुळे ई-पिक पाहणीची अट रद्द करुन शेतकऱ्यांना सरसकट आनुदान द्यावे, अशी मागणी मयुरी खेडकर यांनी केली आहे.

गेवराई तालुक्यात मागील वर्षी कापसाबरोबरच सोयाबीन चा पेरा अधिक झाला होता. मात्र पाहिजे तसा कापूस व सोयाबीनला भाव मिळाला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. दरम्यान राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या हितासाठी शेतकऱ्यांना अनुदान देण्याची घोषणा केली आहे. या संदर्भातील दिनांक २८ जुलै २०२४ रोजी शासन निर्णयानुसार सन २०२३ मधील खरीप हंगामातील सोयाबीन उत्पादन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना ५ हजार अनुदान देण्यात येईल असा निर्णय घेतला आहे. त्यामुळे शेतकऱ्यामधून समाधान व्यक्त जात असले तरी या अनुदानासाठी ई-पिक पाहणी ही जाचक अट ठेवण्यात आली आहे. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांनी खरीप पिक हंगाम २०२३ मध्ये ई-पीक पाहणी केलेली नाही, असे शेतकरी या ठिकाणी अनुदानापासून वंचित राहणार आहेत. या अटीमुळे गेवराई तालुक्यातील हजारो शेतकरी या अनुदानापासून वंचित राहणार आहे. दरम्यान ई-पिक पाहणीबाबत बहुतांश शेतकरी यांना माहिती देखील नाही, तसेच ज्यांना माहिती त्यांना सर्वर डाऊन तसेच काही तांत्रिक अडचणीमुळे ई-पिक पाहणी करता आलेली नाही. त्यामुळे ई-पिक पाहणीची अट शासनाने रद्द करुन शेतकऱ्यांना सरकसकट अनुदान देण्यात यावे, अशी मागणी मयुरी बाळासाहेब मस्के यांनी केली आहे.

## थोडक्यात

### कवडगाव ते श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी पायी दिंडी सोहळा

कवडगाव । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील कवडगाव बुद्रुक येथील भाविक भक्त , भजनी मंडळ व ग्रामस्थांच्या वतीने गेल्या तेरा वर्षापासून २० व्या शतकातील महान विभूती ह.भ.प वैकुंठवासी सद्गुरु किसन बाबा महाराज गोरक्षनाथ टेकडी यांच्या पुण्यस्मरणानिमित्त पायी दिंडी सोहळा आयोजित केला जातो यावर्षी या पायी दिंडी सोहळ्याचे हे वे१३ वर्ष आहे. बाबांच्या पुण्यस्मरण निमित्त या पायी दिंडी सोहळ्याचे प्रस्थान दिनांक १७/८/३०२४ रोजी सकाळी ग्राम प्रदक्षिणा करून मिरवणूक व बजरंग बली चे दर्शन घेऊन प्रस्थान होणार आहे. हि दिंडी मोरेवाडी सुरडी मार्गे संध्याकाळी ताडसोन्ना येथे मुक्कामी येईल रविवार दिनांक १८/८/२०२४ लां घाटसावळी तांडा मार्गे दिंडीचा मुक्काम रात्री श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे होईल दिनांक १९/८/२०२४ श्रावण शुद्ध पौर्णिमा सोमवारी सकाळी दिंडी प्रदक्षिणा होऊन ह.भ.प सद्गुरु किसन बाबा महाराज पुण्यतिथी उत्सव सोहळ्याचे काल्याचे किर्तन श्रवण करून व महाप्रसाद घेऊन दिंडीची सांगता होणार आहे . या पायी दिंडी सोहळ्यामध्ये जास्तीत जास्त भाविकांनी सहभागी होऊन दिंडीचा आनंद घ्यावा असे आवाहन दिंडी चालक, कवडगाव ग्रामस्थ आणि भजनी मंडळ यांनी केले आहे.

### संत भगवान बाबा जयंती पिंपरवाडा येथे साजरी

धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील पिंपरवाडा येथे राष्ट्रसंत ऐश्वर्या संपन्न श्री संत भगवान बाबा यांची जयंती मोठा उत्साहात साजरी करण्यात आली. धारूर तालुक्यातील पिंपरवाडा येथे श्री संत भगवान बाबा यांची जयंती प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली या जयंतीनिमित्त गावात विविध कार्यक्रम घेण्यात आले यामध्ये भारुड ,कीर्तन,मोटरसायकलची भव्य गावापासून ते धारूर पर्यंत १२ कि. मी .अंतराची रॅली व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते, त्याचप्रमाणे गावांमध्ये भव्य दिव्य रथ सजावट करून ऐश्वर्य संपन्न श्री संत भगवान बाबा यांची प्रतिमा ठेवून गावात भव्य मिरवणूक काढण्यात आली दि. ११/०८/२०२४ वार रविवार रोजी मोठ्या उत्साहात व जल्लोषात हा जयंती उत्सव साजरा करण्यात आला यावेळी कीर्तनकार गोविंद महाराज मुंडे यांचे कीर्तन पार पडले.

### पिसाळलेले कुत्र्याने घेतला चार जणांचा चावा

चौसाळा । प्रतिनिधी

येथील एका फिरस्त्या पिसाळल्याल्या कुत्र्याने गावातील जवळपास चार ते पाच जनाला चावल्याने नागरिक भयभीत झाले आहेत या कुत्र्यासह इतर ठिकाणाहून गावात आणून सोडलेल्या तसेच गल्ली बोलातून पाळीव कुत्र्याने नागरिकाला हैराण करून सोडले आहे दरम्यान कुत्र्याचा त्वरित समंधित खात्याने बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिक करतात. चौसाळा तालुका बीड येथील दि १०/८/२०२४ रोजी गावातील एका पिसाळलेल्या कुत्र्याने गल्ली बोलातून फिरून नगरींकाला हैराण करून सोडले तर या कुत्र्याने गावातील व्यवृद्ध महिला साखरबाई परमेश्वर शिंदे यांना तीन ठिकाणी चावा घेतला तर त्याच बरोबर माया गणेश सोनावणे वय ३०वर्ष श्रावण महेश गायकवाड वय वर्ष ४ यांच्यासह इतर दोघांना या कुत्र्याने चावा घेऊन हैराण केले सदर कुत्र्याने चावल्याल्या नागरिकांवर चौसाळा येथील व्यध्यकीय अधिकारी डॉ मोटे यांनी उपचार केला दरम्यान सदर कुत्र्या बरोबर गावातून विशेषतः बसस्टॅण्डवर अश्या फिरस्त्या कुत्र्याची संख्या अधिकच वाढत आहे तर गल्ली बोला तुन पाळीव कुत्रे ही जाणारे येणारे बाळाला व व्रधाला त्रास देत असल्याने नागरिक वैतागून गेले आहे सदर या कुत्र्याचा समंधित खात्याने त्वरित बंदोबस्त करून नागरिकाला या त्रासातून सूडवावले अन्यथा या फिरस्त्या कुत्र्याच्या बंदोबससाठी आगळा मार्ग आवलबावं लागेल अशी मागणी व इशारा गावातील युवा कार्यकर्ते प्रवीण भारत शिंदे या कार्यकर्त्यानि दिल आहे.

# विधानसभेवर शेकापचा लाल झेंडा फडकवा - भाई ॲड.नारायण गोले

माजलगाव। प्रतिनिधी

स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतर अनेक गावांना रस्ता नाही, दळणवळणाची साधनं नाहीत, गावातील मुलांना शिकायला चांगले शाळा नाहीत, शाळेत चांगले शिक्षक नाहीत, तसेच शेतकऱ्यांच्या शेतमालाला कीफायतशिर हमीभाव आजही मिळत नाही,परंतु राज्यकर्ते आमदाराचे मानधन,भत्ते आणि भ्रष्टाचारात मग्न आहेत,शेतकरी आत्महत्येचा आकडा दिवसेंदिवस वाढत असताना त्यावर चिंतन करायला कोणालाही वेळ नाही उलटपक्षी कोट्यावधींच्या गैरव्यवहारातून रातो-रात आमदार विकले जात आहेत, पिढ्यान पिढ्या घराणेशाही पोसली जात असून केवळ भ्रष्टाचार आणि सत्ता केंद्रस्थानी ठेवून राजकारण करणाऱ्या लोकांना जनसामान्याचे



सोयरसुतक उरलेले नाही,भ्रष्ट प्रस्थापित पुढाऱ्यांकडून शेतीचे आणि शेतकऱ्यांचे भले होण्याची सुताराम शक्यता उरलेली नाही,त्यामुळे शेतकऱ्याच्या प्रश्नावर सातत्याने लढणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुलाला आणि शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवाराला शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी विधानसभेत पाठवण्याचे अवाहन शेतकरी कामगार पक्षाचे नेते मध्यवर्ती समितीचे सदस्य भाई ॲड.नारायण गोले पाटील यांनी माजलगाव मतदार संघातील लुखेगाव व मनुर येथे शेतकऱ्यांशी संवाद साधताना दि.१३ ऑगस्ट मंगळवार रोजी केले.यावेळी लुखेगाव व मनुर येथील शेकडो शेतकरी,कष्टकरी, कामगार बांधव उपस्थित होते.

# बालासाहेब केकान यांच्या आमरण उपोषनाने शिक्षण विभाग ताळ्यावर



धारूर । प्रतिनिधी

चाटगाव जि.प.प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकासह शिक्षकांची रिक्त पदे तात्काळ भरण्याच्या मागणीसाठी शिक्षण प्रेमी नागरिक बालासाहेब केकान हे सोमवारी शाळेसमोर उपोषणास बसले होते.या उपोषणाची गटशिक्षणाधिकारी कार्यालयाने दखल घेत तात्काळ दोन शिक्षकांची चाटगाव शाळेस नियुक्ती केली.केकान यांनी आंदोलन केल्याने दोन शिक्षक मिळाल्याने विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान टळले असल्याच्या प्रतिक्रिया पालकांतुन व्यक्त केल्या जात आहेत.

तेलगाव पासुन जवळच असलेल्या चाटगाव ता.धारूर येथील जि.प.प्राथमिक शाळेस मुख्याध्यापकासह दोन शिक्षकांची पदे रिक्त आहेत. त्यामुळे याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर होऊन, त्यांचे शैक्षणिक नुकसान होत होते.याची दखल चाटगावचे सामाजिक कार्यकर्ते तथा शिक्षण प्रेमी नागरिक बालासाहेब केकान यांनी घेऊन, धारूर तालुका गटशिक्षणाधिकारी कार्यालयास चाटगाव शाळेस मुख्याध्यापकासह शिक्षकांची रिक्त पदे भरावी.यासाठी अर्ज, निवेदन दिले.तसेच तोंडी सांगितले.मात्र गटशिक्षणाधिकारी कार्यालयाने याकडे दुर्लक्ष केले.त्यामुळे बालासाहेब केकान यांनी सोमवार दि.१२०८२०२४ पासुन चाटगाव जि.प.प्राथमिक शाळे समोर अमरण उपोषणास बसणार असल्याचा इशारा दिला होता.त्याप्रमाणे बालासाहेब केकान हे सोमवार चाटगाव शाळेसमोर उपोषणास बसले.ते उपोषणास बसल्याचे समजताच शिक्षणअधिकारी मनोज कोल्हे खडबडून जागे झाले.

शिक्षण अधिकारी यांनी उपोषणाची दखल घेत उपोषणस्थळी केंद्रप्रमुख रामहारी गांधले यांना पाठवुन, दोन शिक्षकांची तात्काळ नियुक्ती केल्याचे सांगत,उर्वरित मुख्याध्यापक व एक पदवीधर शिक्षकांचीही लवकरच नियुक्ती करून आपल्या मागण्यांची पुर्तता केली जाईल. असे लेखी अश्वासन शिक्षण विभागाकडून केकान यांना दिले. शिक्षण प्रेमी नागरिक बालासाहेब केकान यांच्या आंदोलनामुळे चाटगाव शाळेस तात्काळ दोन शिक्षक मिळाल्याने विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान टळले असल्याच्या प्रतिक्रिया पालकांतुन व्यक्त केल्या जात आहेत.

# वेळ आणि पैशांची बचत, विंचू-सापाचीही शेतकऱ्याला नाही भीती

दिंद्रुड। प्रतिनिधी

पारपारिक शेती करताना शेतकऱ्यांना अनेक अडचणी येतात, त्याला फाटा देत माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड,जवळा येथील शेतकऱ्यांनी ड्रोन द्वारे फवारणी करत शेतीच्या आधुनिकतेकडे वाटचाल सुरू केली आहे, त्याचा यशस्वी प्रयोग होत असून वेळ व पैसा वाचण्यात शेतकऱ्यांना मदत मिळत आहे.

दिंद्रुड येथील अंकुश ठोंबरे व बाळू कोल्हापुरे यांनी शेतात फवारणीसाठी ड्रोन खरेदी केले आहे. कीटनाशक ,बुरशीनाशक व टॉनिक ची फवारणी करताना चांगला मार्ग आता शेतकऱ्याला सापडला आहे. जवळा येथील भागवत साबळे, रामदादा साबळे यांच्या तीन एकर, दिंद्रुड येथील अमोल बालासाहेब ठोंबरे यांच्या तीन एकर सोयाबीन फवारातांना केवळ वीस मिनिटांचा वेळ लागला. तीन ते साडेतीन फूट वाढलेले रोपट्यात अनेक आडकाटे येतात, फवारणी पंपाद्वारे फवारताना मनुष्यबळ जास्त लागते त्यातच दाट वाढलेल्या झाडीमध्ये फवारताना असुरक्षितता जाणवते. याला पर्याय म्हणून ड्रोन द्वारे फवारताना वेळेची बचत तर होतेच मात्र मनुष्यबळ ही कमी लागते. यामुळे शेतकऱ्यात समाधान व्यक्त होत असल्याचे पाहायला मिळत आहे.

### ड्रोन द्वारे सोयाबीन फवारण्याचा प्रयोग होतोय यशस्वी

ड्रोन द्वारे फवारणी करताना एका वेळी १० लिटर ची क्षमता असलेली टाकी ड्रोनला बसवलेली असते. १५० मिली कीटकनाशक, १०० मिली बुरशीनाशक व पाचशे मिली डीएपी लिक्विड सह १० लिटर पाणी एका वेळी एक एकर फवारणीसाठी वापरात येते.

**-मनोज बालासाहेब ठोंबरे,शेतकरी**

पिक फवारणी पंपाद्वारे फवारणी करताना औषधाची जास्त प्रमाणात सांडा सांड होते, मुळापासून रोपट्यांना योग्य तितका फवारा मिळत नाही, ड्रोन द्वारे फवारणी करताना औषधाची बचत त्याचप्रमाणे प्रचंड वेगात वाहणाऱ्या वाऱ्यामुळे मुळापासून शेंड्यापर्यंत औषधाची फवारणी होते.

**-गौतम ठोंबरे, शेतकरी,दिंद्रुड**

# जीवनात यशस्वी होण्यासाठी भगवंताला शरण जा-शिवानंद शिवाचार्य

बीड । प्रतिनिधी

येथून जवळच असलेल्या श्रीक्षेत्र कपिलधार येथे काल दि १२/८/२०२४ सोमवार रोजी श्रावण मासानिमित्त गुरूवर्य प.पु.ष.ब्र.१०८ तपोरत्न श्री. शिवानंद शिवाचार्य महास्वामीजी तमलूरकर यांचे ४० वे अनुष्ठान चालू आहे. या अनुष्ठानात शिवपाठ , सामुहिक ईष्टलिंगपुजा, गाता भजन व गुरूवर्यांचे अमृत उपदेश व श्रोते यांना शिवमहिमा महाराज सांगत आहेत. भगवान शिवशंकर हे भक्तवत्सल आहेत ज्या ज्या ठिकाणी शिवाचा पूजा पाठ, पठण, सेवा व शिव आराधना असते त्या त्या ठिकाणी भगवान शिवाचा वास आहे असे महत्त्वपूर्ण उद्धार महाराजांनी भक्त मंडळींना सांगितले.

श्रीक्षेत्र कपिलधार येथे जमलेल्या सर्व भक्तगणांना शिवचार्य महाराजांनी शिवमहिमा सांगताना रामायणातील एक उदाहरण सांगितले म्हणजे प्रभुरामचंद्र आणि सर्व वानरसेना लंकेवर विजय करण्यासाठी समुद्र तीरावर गेली होती. समुद्र तीरावर प्रत्यक्ष भगवान प्रभू रामचंद्र आणि शिवलिंग स्थापून त्यांची आराधना केली आणि आपले कार्य पूर्ण व्हावे यासाठी शिवाला साकडे घातल आणि पुढे लंका विजय प्राप्त केला .याबरोबरच महाराजांनी साधू संतांचे अनेक दाखले दिले या धर्तीवर संताचा महिमा आगात आहे संतांमध्ये दया ,करुणा ,प्रेम, शांती व सहनशीलता ही ओतप्रोत भरलेली असते. महाराज म्हणाले आपल्या जीवनामध्ये आपण या संतांना शरण गेलं की आपलं इच्छित कार्य पूर्ण होते यामध्ये शंकाच नाही.या तपोअनुष्ठान कार्क्रमाला आंध्रप्रदेश,कर्नाटक , तेलंगणा,बीड ,कपिलधारवाडी,आदी विविध राज्यातून तसेच पंचक्रोशीतील असंख्य भावीक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



माजलगाव:- येथील कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयात ''हर घर तिरंगा'' या अभियानअंतर्गत राष्ट्रध्वज फडकवताना बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी मोरे यावेळी संचालक भगवानराव आगे, खदीर पठाण, सचिव हरिभाऊ सवणे, आडत व्यापारी,सामाजिक कार्यकर्ते व सर्व कर्मचारी बांधव.

# मनूर येथील पूरग्रस्तांना करावा लागतोय संघर्ष

माजलगाव । प्रतिनिधी

शहरा लगत असणारे मौजे मनूर या गावचा अतिवृष्टीमूळे सिंधफना नदीस सन जुलै १९८९ मध्ये मोठा पुर आला होता,त्यावेळी गट नंबर २४ हा मौजे मनूर येथील शासनाने ४ हेक्टर ४७आर इतकी जमिन पूरग्रस्ताच्यां वास्तव्यासाठी उपलब्ध करून दिली असता त्याचे पूरावेही उपलब्ध असताना फक्त शासनाच्या तलाठी व मंडळ अधिकारी यांनी संगनमत करून सदरील हरकत आणणार्या व्यक्तीचे नाव सातबार्यावरून हटवले नसल्यामूळे ती व्यक्ती ताब्यास हरकत नोंदवत आहे.

शासनाने दिलेल्या क्षेत्रावर पूरग्रस्त लोक घरे बांधुन राहत असून मनूर या गावी कायम वास्तव्यात आहे. तसेच तत्कालीन मंडळधिकारी व तलाठी यांनी सातबारा वरील पिकपेरा मध्ये ४ हेक्टर ४७ आर





जमिन हि पूरग्रस्तासाठी संपादित जागा म्हणून उल्लेख केला आहे पूरग्रस्तांच्या ताब्याला घाडगे परिवार हरकत अडथळा करीत आहे.तसेच पूरग्रस्त वास्तव्यास असणार्या लोकांना दमदाटी करून सदर जागेवरून हाकलून देण्याची धमकी देत आहेत. गट नंबर २४ मधील ४ हेक्टर ४७ आर हे क्षेत्र आम्हाला म्हणजेच पूरग्रस्तांसाठी दिल्याची नोंद शासकीय कागदोपत्री आहे हे त्या लोकांना माहीत असूनही जाणीवपूर्वक पैसे उकळण्याच्या उद्देशाने पूरग्रस्त गावाला धमकावत आहेत विशेष करुन संबधित लोकांना जागेचा मोबदलाही मावेजामिळाला आहे.शासनाने सदर गटामधील क्षेत्र दिल्या नंतर त्यांचा म्हणजेच घाडगे परिवाचा या लोकांचा काही ही हक्क अधिकार, ताबा व मालकी नसताना पुरग्रस्तांना उठविण्याचा प्रयत्न करत आहेत व बेकायदेशीर पणे गाव गूंड आणून बेदखल करण्याचा प्रयत्न आहे. पूरग्रस्तांसाठी संपादित केलेल्या क्षेत्राची नोंद शासकीय कागदोपत्री आहे असे असताना वरील लोकांनी शासनाची फसवणूक व दिशाभूल करून वारस प्रमाणपत्र आधारे फेरफार नोंद करुन घेतल्याचे दिसून येत आहे,तरी सदर कृत्य बेकायदेशीर असून फसवणूक व दिशाभूल करून नोंदवलेला फेरफार ११८९ व २१० तात्काळ रद्दबातल करण्यात यावा.व आमच्या म्हणजेच पूरग्रस्तांच्या नावाची नोंद सर्व शासकीय कागदोपत्री तात्काळ नोंद घेऊन आम्हाला न्याय देण्याची कृपा करावी.शासकीय नियमानुसार आम्ही सर्व गावकरी शासनाने दिलेल्या जागेतच गेली ३५ ते ३९ वर्ष झाले तिथेच वास्तव्यात आहोत तसेच ७/१२ उतारावर असलेली वरील लोकांच्या नावाला आळा मारून आमच्या म्हणजेच पूरग्रस्तांच्या नावाची नोंद तात्काळ घेऊन आम्हाला शासनाने केलेल्या चूकीचा परिणाम भोगावा लागत आहे जो पर्यत वरील लोकांच्या नावाला शासन आळा मारत नाही तो पर्यत आम्ही गावकरी अमरण उपोषण देशाच्या स्वातंत्र्य दिना दिवशी पण करणार आहोत हि वेळ तहसिलच्या उदासिनतेमूळेच समस्त मौजे मनूर येथील गावकर्यावर आली.देशाच्या स्वातंत्र्यदिन असतानाही आम्हा पूरग्रस्तानां न्याय मिळत नसून सर्व गावकरी पूर्वीच्या तहसील प्रशासनाच्या हलगर्जीपणामूळे वैतागून गेले असून जो पर्यत पूरग्रस्ताची नोंद सातबारा वर होत नाही तो पर्यत समस्त गावकरी कायम उपोषण करणार व करीत राहणार असा पवीत्रा सर्व गावकर्यांन घेतला आहे.

# जायकवाडी प्रकल्प माजलगाव धरण परिसरातील उद्यानाचे काम तात्काळ सुरु करा अन्यथा जन आंदोलन करू -प्रा.ईश्वर मुंडे

माजलगाव प्रतिनिधी

शहरापासून अवघ्या दोन ते तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या जायकवाडी प्रकल्प अंतर्गत बांधण्यात आलेल्या माजलगाव धरण परिसरात उद्यान व वाटर पार्कची मागणी गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. पण उदासीन मानसिकतेत असलेल्या प्रस्थापित सत्ताधाऱ्यांनी माजलगावकरांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाकडे सपसेल डोळे झाक केलेली आहे.



माजलगाव धरण परिसरात उद्यान व वाटरपार्क साठी पुरेशी जागा उपलब्ध आहे मात्र आज तागायत हा प्रश्न प्रलंबितच का राहिला ? असा प्रश्न उपस्थित करून या प्रश्नाकडे सपसेल डोळे झाक करणाऱ्या प्रस्थापित सत्ताधारी व विरोधकांनीही यावर आज पर्यंत का आवाज उठवला नाही? असा प्रश्न उपस्थित करून माजलगावकरांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्न असलेल्या उद्यान व वाटर पार्क हे मंजूर करून लवकरात लवकर त्याचे काम सुरू करण्यात आले पाहिजे. उद्यान व वॉटर पार्क सारखा प्रकल्प माजलगाव परिसरात राबविण्यात आला असता तर माजलगावच्या वैभवात आणखीन भर पडली असती व वाटर पार्क सारख्या प्रकल्पामुळे जे लोक आज धरण परिसरात स्विमिंग साठी जात आहेत त्यांचे धरण परिसरात टाकलेल्या जाळ्यात अडकून काही लोकांचे दुर्दैवी मृत्यू देखील झालेले आहेत याचेच उदाहरण म्हणजे डॉ. फपाळ , पि.एस.आय. सोनवणे सारख्या कर्तबगार लोकांना जीव गमवावा लागलेला आहे. अशा दुर्घटना पुन्हा होऊ नये यासाठी या परिसरात वाटर पार्क व उद्यान होणे आवश्यक आहे. धरण परिसरात होत असलेले अतिक्रमण शासनाने लवकरात लवकर काढून या जागेवर उद्यान व वाटर पार्क सारखा प्रकल्प राबवावा आणि माजलगावच्या वैभवात भर टाकावी. माजलगावकरांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या मागण्या वेळीच मान्य न झाल्यास आम्ही जन आंदोलन उभा करणार असल्याचे प्रा.ईश्वर मुंडे यांनी मत व्यक्त केले.

प्रा.ईश्वर मुंडे यांनी दि.१३ ऑगस्ट रोजी माजलगाव धरण परिसराची पाहणी केली यावेळी लहुजी विद्रोही सेनेचे संस्थापक अध्यक्ष भास्कर नाना शिंदे, काँग्रेस नेते दत्ता कांबळे, अभय भैया होके, अनंत घडसिंगे, प्रभाकर नरवडे, जुनेद खा पठाण, फैजल मोमीनसह समविचारी पक्ष व संघटनांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

### माजलगाव मतदार संघात सुंदरराव सोळंके टेक्स्टाईल पार्क प्रकल्पाचे काय?

सन २०१४ मध्ये तात्कालीन आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी सुंदरराव सोळंके प्रकल्पाचे आश्वासन माजलगावकर यांना दिलेलं होतं तो प्रकल्प अध्याप पर्यंत पूर्णत्वास आलेला नाही त्यामुळे माजलगावकर सुंदरराव सोळंके टेक्सटाईल पार्क प्रकल्पाच्या प्रतीक्षेत आहेत. प्रत्योक विधानसभेच्या वेळेस देण्यात येणाऱ्या सुंदरराव सोळंके टेक्स्टाईल पार्क प्रकल्पाच्या आश्वासनाचे झालं काय ? असा सवाल काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष तथा परळी विधानसभा मतदारसंघाचे निरीक्षक दत्ता कांबळे यांनी केला आहे

# धानोरा रोड ५० फुटाचा होणार; सिमेंट नाली बांधकामास तांत्रिक मान्यता मिळाली

## प्रशासकीय मान्यतेसाठी नगर विकास विभागाकडे प्रस्ताव सादर

बीड । प्रतिनिधी

पोलीस मुख्यालय ते पालवण चौक हा रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. या रस्त्यासाठी नगरसेवक मोरे, क्षीरसागर, वंचितचे नेते अजय सरवदे, सामाजिक कार्यकर्ते संभाजी सुर्वे यांनी असंख्य निवेदने तक्रारी दिली व आंदोलने केली आहेत. या रस्त्यावर मोठे मोठे खड्डे पडल्याने नितेश उपाध्ये यांनीही आमरण उपोषण केले आहे प्रशासनाकडून तोंडी आश्वासन मिळाले पण कारवाई झाली नाही.

सदरील रस्त्याचे काम भूसंपादन कारवाईमुळे थांबलेले आहे तसेच प्रकरण मा. उच्च न्यायालय छत्रपती संभाजी नगर याठिकाणी दाखल असून मा.न्यायलायचा आवमान होऊ नये म्हणून प्रशासन खड्डे बुजविण्यासाठी टाळाटाळ करत आहे. तात्काळ भूसंपादन प्रक्रिया राबवावी अशी मागणी नागरिकांतून व्यक्त होत आहे.

धानोरा रोड परिसरातील नागरिकांची दयनीय अवस्था पाहून मुख्यधिकारी अंधारे मॅडम यांनी दखल घेत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) अंतर्गत बीड नगर परिषद डी.पी. रस्त्याचे सिमेंट काँक्रीट रस्ते व पक्की नाली बांधकाम करुन पान ३ वर

### उपोषणकर्त्याचा धानोरा रोडच्या कामाचे श्रेय घेण्याचा केविलवाणा प्रयत

पोलीस मुख्यालय ते पालवन चौक या रस्त्याचे नूतनीकरणासह सिमेंट रोड नालीसह होणार आहे तांत्रिक मान्यता मिळाली आहे. निधी मागणी व प्रशासकीय मान्यता बाकी आहे ती ही लवकरच मिळेल असे असताना धानोरा रोडचे एक रहिवाशी यांना हा सर्व प्रकार माहीत असतानाही तोच मुद्दा घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसले आहेत. त्यांना रस्त्याच्या कामाचे श्रेय मिळविण्यासाठी उपोषनाचा स्टंट करत असल्याचा आरोप वंचितचे अजय सरवदे यांनी केला आहे.

# जनसामान्यांसाठी वर्षा बंगल्याचे दार कायम खुले -मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

बीड । प्रतिनिधी

हिंदुहृदयसम्राट मा.बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन तथा महाराष्ट्राचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे आणि संसदरत खा.डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या नेतृावाखाली सुरु असलेल्या शिवसनेच्या दमदार अशा कार्यपद्धतीस प्रभावित होऊन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर उबाठा शिवसेनेतील महिला आघाडी जिल्हाप्रमुख ॲड.संगीता चव्हाण, तथा महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या सदस्या युवासेना जिल्हाप्रमुख ॲड.रवीराज बडे, गजानन कदम आणि



ॲड.संगिताताई चव्हाण, बडे, कमद, यांच्यासह असंख्य महिलांना मुख्यमंत्री शिंदेंनी वर्षा बंगल्यावर दिला प्रवेश

त्यांच्या असंख्य महिला आणि सर्व समर्थक कार्यकर्त्यांचा आज दि.१३ ऑगस्ट रोजी रात्री २.३० वाजता वर्षा बंगल्याच्या निवास्थानी मुंबई येथे महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री, शिवसेना मुख्य नेते यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवेश घेण्यात आला. यावेळी विधान पदिषदेच्या उपसभापती निलमताई गोऱ्हे, शिवसेना जिल्हा प्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक यांच्यासह प्रमुख नेत्यांची उपस्थिती होती. ॲड.संगिताताई चव्हाण, रवीराज बडे आणि गजानन कदम यांच्या प्रवेशासाठी सोमवार दि.१२ ऑगस्ट रोजी बीड शहरातून ४०० ते ५०० गाड्यांचा ताफा मुंबईकडे रवाना होण्यापुर्वी बीड शहरामध्ये शिवसेनेच्यावतीने जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्वाखाली शक्तीप्रदर्शन करत रॅली काढण्यात आली. पान ३ वर

# डॉ. स्वरूप सिंह हजारी यांच्या मार्गदर्शनाखाली घर घर तिरंगा अभियानास सुरुवात

किल्ले धारूर । प्रतिनिधी

देशभरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून हर घर तिरंगा अभियान सुरू करण्यात आले आहे धारूर शहरांमध्ये या अभियानाची सुरुवात घरोघर तिरंगा वाटून केली आहे किल्ले धारूर येथे सुजान लॉन या ठिकानी भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेचं प्रतीक म्हणजे आपला राष्ट्रध्वज तिरंग भारतीय जनता पार्टी प्रदेष कार्यकारणी सदस्य तथा नगर अध्यक्ष डॉ स्वरुपसिंह हजारी यांच्या मार्गदर्शना खाली घरोघरी तिरंगा वाटप व बुथ प्रमुख व नगर सेवक याना तिरंगा वा टप करण्यता आले तसेच




१३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२४ दरम्यान आपणही आपल्या घरांवर तिरंगा लावण्याचे आवाहन केले. आपला राष्ट्रध्वज तिरंगा झेंड्या प्रति असलेला सन्मान, आणि बंधुभाव वाढावा व स्वातंत्र्यासाठी लढलेल्या स्वातंत्र्यासेनानींचा संघर्ष आजच्या पिढ्यांना अवगत व्हावा म्हणून हर घर तिरंगा अभियान सुरू केले आहे या वेळी भारतीय जनता पार्टी प्रदेष कार्यकारणी सदस्य तथा नगर अध्यक्ष डॉ स्वरुप सिंह हजारी साहेब तालुका अध्यक्ष एडवोकेट बालासाहेब चोले शहर अध्यक्ष दत्ता भाऊ धोत्रे, यूवा मोर्च शहर अध्यक्ष एडवोकेट मोहन भोसले, नगर सेवक सचिन दुबे नगर सेवक सुरेश लोकरे संतोष सिंह पवार नगर सेवक सिराज भाई यूवा नेते राधाकृष्ण चोले खाड़े खिंडरे व पदाधिकारी व नागरिक मतदार संख्येने उपस्थित होते.

# जिजाऊ मल्टीस्टेट ठेवीदारांची नूतन पोलीस अधीक्षक बारगळ यांच्याकडे धाव

## मुख्य आरोपी बबन शिंदेला तात्काळ अटक करा; थोडा वेळ द्या निश्चित न्याय देऊ – अविनाश बारगळ

बीड । प्रतिनिधी

जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट बीड २०० कोटी ठेव घोटाळा गुन्ह्यातील मुख्य आरोपी बबन शिंदे याला तात्काळ अटक करून गुन्ह्याचा फेर तपास करावा. एम पी आयडी १९९९ कायद्या अंतर्गत पाठवलेला प्रस्ताव अपूर्ण असून, या प्रस्तावात मुख्य आरोपी अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी, कर्मचारी, संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांची बीड जिल्हा बाहेरील मालमत्ता शोधून जप्तीची कारवाई करावी. एस आय टीचे पुनर्गठन करण्यात यावे. या विविध मागण्यासाठी जिजाऊ मल्टीस्टेट ठेवीदारांनी बीडचे नूतन पोलीस अधीक्षक श्री. अविनाश बारगळ यांची भेट घेतली. थोडा वेळ द्या प्रकरणाची पूर्ण माहिती घेतो. कसून चौकशी करून ठेवीदारांना न्याय देऊ असे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी अशोकराव हिंगे, ॲड. अप्पासाहेब जगताप, डॉ. अरविंद काकडे, मारुती तिपाले, शेख कुतुब भाई, भाऊसाहेब परसे, इंजि. सखाराम कळासे, चंद्रकला बांगर, विशाखा सूर्यवंशी, मीरा सोनवणे, रवींद्र पालीमकर, अच्युत वाघ, सूर्यभान नवले, डॉ. उमरजकर, सुभाष शिराळे, प्रवीण पोकळे, महेश साळुप्पा, अच्युत सावंत, इंजि. मुलाणी आदिसह ठेवीदार उपस्थित होते.



जिजाऊ मल्टीस्टेट प्रकरणात ०३ जुलै २०२३ रोजी गुन्हा नोंद झाला. ०२ फेब्रुवारी २०२४ रोजी एस आय टीची नेमणूक झाली. दुर्दैवाने एसआयटी पथकातील तपास अधिकारी आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हरिभाऊ खाडे एक कोटी लाच प्रकरणात अडकले. पो.नि खाडे यांनी सुरवातीपासून मुख्य आरोपी शिंदे सह सर्व आरोपींना अप्रत्याक्षपणे मदत केली. यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी अश्विनी वांढरे व बबन शिंदेचा मुलगा मनीष शिंदे अंतरिम जामीनवर उजळ माथ्याने फिरत आहेत. ठेवीदारांच्या हिताच्या दृष्टीने तपास न झाल्याने ठेवीदार बांधव संतप्त आहेत. यापूर्वी अनेकदा पोलीस अधीक्षक व वरिष्ठांना प्रत्याक्ष भेटून निवेदन दिले. मात्र याबाबत गंभीर पाउल पोलीस प्रशासनाने उचलेले नाही. नूतन पोलीस अधीक्षका मार्फत न्याय मिळवण्यासाठी ठेवीदारांनी नूतन पोलीस अधीक्षकाकडे धाव घेतली. पोलीस अधीक्षक श्री बारगळ यांना आर्थिक गुन्हे शाखेच्या कामाचा अनुभव असल्याने जिजाऊ माँसाहेब ठेवीदारांना न्याय देण्यासाठी निश्चित सहकार्य लाभेल अशी अपेक्षा ठेवीदारांकडून व्यक्त केली जात आहे

# आष्टीत ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते १०१ फुटी तिरंगा ध्वजारोहण संपन्न



आष्टी । प्रतिनिधी

वंदे मातरम्,भारत माता की जय,हर घर तिरंगा,घर घर तिरंगा तसेच देशभक्ती पर गीते,हजारो विद्यार्थ्यांसह ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये १०१ फुटी तिरंगा ध्वजारोहण कार्यक्रम मंगळवार दि.१३ ऑगस्ट रोजी सकाळी थाटात संपन्न झाला.

प्रत्योकांच्या हाती असलेला तिरंगा ध्वजाणे, आणि भारत मातेच्या जयघोषाने वातावरण दुमदुमून गेले होते. देशाचे पतप्रधान पान ३ वर

### भारत मातेच्या जयघोषाने शहर दुमदुमले

### आज विद्युत रोषणाई व फटाक्यांची आतषबाजी

आज बुधवार दिनांक १४ रोजी सायंकाळी सात वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आकर्षक विद्युत रोषणाई तसेच फटाक्यांची आतषबाजी होणार असून सर्व आष्टीकर तसेच परिसरातील नागरिकांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन युवा नेते जयदत्त धस राधेश्याम धस यांनी केले आहे.

# ऊसतोडणी कामगाराचा मुलगा संतोष आंधळे बनला फौजदार

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील आंधळेवाडी येथील नामदेव आंधळे हे साखर कारखान्यावर ऊस तोडणीचे काम करीत आहेत.या ऊस तोडणी कामगाराचा मुलगा संतोष आंधळे याची पोलीस उपनिरीक्षक म्हणून निवड झाली आहे. बी.काम. झाल्यावर मित्राकडून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा देण्याचा मार्ग सापडला अन्? संतोषने आपले स्पर्धा परिक्षेचे प्रयत सुरु केले. मित्राबरोबर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची

परीक्षा देणे सुरु केले.अहमदनगर येथे अतिशय प्रतिकुल परीस्थीतीत राहुन तयारी केली. त्याने अभ्यास पद्धतीत बदल करून परीक्षा दिली. सुरु ठेवले.पहिल्या प्रयतात त्याने यश संपादन केले.पोलीस उपनिरीक्षक परीक्षेचा निकाल लागला आहे. या परीक्षेत पास होऊन त्याची निवड झाली. सांतोषसह आईवडीलांचे स्वप्न साकार झाले आहे.एका ऊस तोडणी कामगाराचा मुलगा संतोष आंधळे फौजदार बनला आहे.




आंधळेवाडीचे नाव उज्वल करणारा फौजदार संतोष आंधळे

### महेश पाटील,देविदास धस, विजय गोल्हार यांचे प्रतिपादन

आपल्या कुटुंबाचे व आंधळेवाडीचे नाव उज्वल करणारा संतोष आंधळे ठरला असे प्रतिपादन

जमखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महेश पाटील, माजी उपसभापती देविदास धस, समाजसेवक विजय गोल्हार,जि.प. सदस्य अमरराजे निंबाळकर यांनी केले. आष्टी तालुक्यातील आंधळेवाडी येथील सुपुत्र संतोष नामदेव आंधळे,भुषण पिसे यांची पोलीस उपनिरीक्षकपदी तर रुषिकेश गिते यांची लेखापाल वनविभाग तर गहिनीनाथ नागरगोजे उपकर अधिकारी म्हणून निवड झाल्याबद्दल आयोजित सत्कार सभेत ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.यावेळी माजी उपसभापती देविदास धस, समाजसेवक विजय गोल्हार, जामखेडचे पोलीस निरीक्षक महेश पाटील,अमरराजे निंबाळकर, गहिनीनाथ नागरगोजे,रुषीकेश गिते,तुाषार तोडमल,भुषण पिसे,पोलीस उपनिरीक्षक मंगेश नागरगोजे,उत्तम बोडखे,अमरराजे निंबाळकर,सरपंच आबासाहेब गिते,सरपंच शेषनारायण खरमटे,

सरपंच गणेश माळवे,सरपंच अंगद शिंदे आदि मान्यवर उपस्थित होते.यावेळी प्रस्ताविक जि.प. चे शिक्षक पद्नाथ गर्जे यांनी केले.यावेळी समाजसेवक विजय गोल्हार म्हणाले की,लोकनेते गोपीनाथ मुंडे यांचा भक्त म्हणून मी पुढाकार घेऊन या आंधळेवाडीत अभ्यासिका बांधली आहे. लाल दिव्याच्या गाडीत बसायचे किंवा उच्च पदस्थ अधिकारी व्हायचे स्वप्न ठेवा.जिल्हाधिकारी, तहसिदार व्हावेत ही आमची अपेक्षा आहे. ती अपेक्षा ईच्छा आंधळेवाडीतील युवक बांधवांनी पुर्ण करावी असे आवाहन केले. आंधळेवाडी हे गाव लोकनेते मुंडेसाहेबांच्या काळजातील गाव आहे.येथे अनेक पान ३ वर



बीड – येथील स्वराज्य सोलर अँड वॉटरच्या शुभारंभ प्रसंगी अजय भोसले यांना शुभेच्छा देताना दैनिक राज्य लोकतंत्रचे कार्यकारी संपादक अशोक खाडे , दैनिक मराठवाडा पत्रचे संपादक दत्तात्रय नरनाळे ,ॲड. शाम शिंदे

**शिवसागर लोण कन्सलटन्सी**
**हरिओम कॉम्प्लेक्स, अंबिका चौक, बीड**

**पाहिजेत**

१. टेलिकॉलिंग–२ जागा (महिलांसाठी)
शैक्षणिक पात्रता–किमान बारावी पास
२. कॉम्प्युटर ऑपरेटर –१ जागा
शैक्षणिक पात्रता–(पदवीधर) टॅली आवश्यक महिला किंवा पुरुष
कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य

**गणपती केंद्रे**
शाखा व्यवस्थापक (मो.७०२०७६३३३१)

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at: Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# बहीण सुप्रिया सुळेंविरुद्ध सुनेत्राला उभं करणं मोठी चूक होती-अजित पवार

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीची लगबग सुरु असताना राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा अजित पवार यांनी एक स्फोटक कबुली दिली आहे. लोकसभा निवडणुकीत बारामती मतदारसंघातून सुप्रिया सुळे यांच्याविरोधात सुनेत्रा पवार यांना रिंगणात उतरवणे, ही एक मोठी चूक असल्याचे त्यांनी सांगितले. राजकारण हे पार घरामध्ये शिरुन द्यायचं नसतं. मागे मात्र माझ्याकडून थोडी चूक झाली. त्या काळामध्ये मी माझ्या बहिणीच्या विरोधात सुनेत्राला उभं करायला नको होतं. त्यावेळेस केलं गेलं, पार्लमेंटरी बोर्डाकडून निर्णय घेतला गेला. पण एकदा बाण सुटल्यावर आपण करु शकत नाही. पण आज माझं मन मला सांगतं, तसं व्हायला नको होतं, अशी कबुली अजित पवार यांनी दिली. ते एका मराठी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत बोलत होते. यावेळी अजित पवार यांनी दिलेली कबुली महाराष्ट्रातील बदलत्या राजकारणाची नांदी तर नाही ना, अशी चर्चा आता राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.



रक्षाबंधनाच्या सणाला अवघे काही दिवस शिल्लक असताना अजित पवार यांची ही कबुली चर्चेचा विषय ठरत आहे. बारामतीत पवार घराण्यातील दोन व्यक्तींना आमनेसामने लढवण्याची चूक लक्षात आल्यानंतर तुम्ही आता रक्षाबंधनाच्या सणाला सुप्रिया सुळे यांना भेटायला जाणार का, असा प्रश्न अजित पवार यांना मुलाखतीमध्ये विचारण्यात आला. त्यावर अजित पवार यांनी म्हटले की, आता माझा महाराष्ट्राचा दौरा सुरु आहे. रक्षाबंधनाच्यावेळी मी तिकडे असेन तर मी राखी बांधून घ्यायला बहिणींकडे जरुर जाणार, असे अजित पवार यांनी सांगितले.

अजित पवार हे सध्या जनसन्मान यात्रेच्या निमित्ताने महाराष्ट्रात फिरत आहेत. लोकसभा निवडणुकीनंतर अजित पवार यांच्या पक्षाने प्रसिद्धी आणि प्रचाराच्या बाबतीत कात टाकल्याचे दिसत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रतिमासंवर्धनासाठी एका कंपनीची नेमणूक करण्यात आली आहे. या कंपनीने सल्ला दिल्यानुसार अजित पवार गटाकडून सध्या राज्यातील महिला मतदारांवर लक्ष केंद्रित केले जात आहे. त्यासाठी अजित पवारांकडून सुरु असलेले पिंक पॉलिटिक्स चर्चेचा विषय ठरत आहे. अजित पवार आता सार्वजनिक व्यासपीठावर फक्त गुलाबी जॅकेट परिधान करत आहेत. जनसन्मान यात्रेतील त्यांच्या सर्व गाड्या गुलाबी रंगाने रंगवण्यात आल्या आहेत. अजित पवार यांनी कालच धुळ्यात शेतावरील बांधावर जाऊन त्याठिकाणी काम करणाऱ्या महिलांशी संवाद साधला होता. एकूणच अजित पवार यांच्याकडून महिला मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न केले जात आहेत. त्यामुळे सुप्रिया सुळे यांच्याविरोधात बायकोला रिंगणात उतरवणे, ही चूक होती, ही अजित पवार यांची कबुली अजितदादांच्या प्रतिमासंवर्धनासाठी वापरण्यात आलेल्या रणनीतीचाच एक भाग आहे का, हे येणाऱ्या काळात स्पष्ट होईल.

# कादवे खिंडीत दरड कोसळली; वेल्हे-पानशेत रस्ता बंद

**वेल्हे । प्रतिनिधी**

पानशेत व तोरणा वेल्हे भाग जवळच्या अंतराने जोडणाऱ्या पानशेत-वेल्हे रस्त्यावर कादवे (ता.राजगड) खिंडीत मंगळवार दि. १३ सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास मोठी दरड कोसळली. त्यामुळे वेल्हे-पानशेत रस्त्यावरील वाहतूक दुपारपर्यंत बंद पडली होती. त्यावेळी खिंडीतुन कादवे गावातील समीर जाधव (वय ३०) मोटरसायकलवरुन कादवे गावात चालला होता. तो पुढे निघून गेल्याने नशीब बलवत्तर म्हणून त्याचे प्राण वाचले. समीर याच्या पाठोपाठ दुध वाहतूक करणारा टेम्पोही थोडक्यात वाचला.



डोंगराची दरड टप्प्याटप्प्याने रस्त्यावर येत होती. त्यामुळे सुदैवाने जिवितहानी टळली. १० ते १५ मिनिटांत डोंगराचा मोठा भाग कोसळून रस्त्यावरील वाहतूक पूर्ण बंद झाली. घाट रस्त्याच्या रुंदीकरणासाठी तोडलेल्या डोंगरांच्या कड्याची मोठी दरड उन्मळून कादवे-विहीर खिंडीत कोसळली. त्यामुळे या ठिकाणच्या रस्त्यावरील वाहतूक धोकादायक बनली आहे.

सध्या पाऊस नाही; मात्र गेल्या महिनाभर पडलेल्या अतिवृष्टीमुळे डोंगराच्या उन्मळलेल्या दरडी ठिसुळ झाल्याने कोसळत असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे शाखा अभियंता प्रकाश गाडे यांनी सांगितले. कादवेचे ग्रामपंचायत सदस्य मोहिल तेलावडे, विनोद बिरामणे आदी ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली.

बांधकाम विभागाचे शाखा अभियंता साईप्रसाद मुनगिलवार, शाखा अभियंता प्रकाश गाडे यांच्या देखरेखीखाली जेसीबी मशीनने दरड काढण्याचे काम सकाळी सुरू करण्यात आले. जवळपास चार ते पाच तास दरड हटविण्याचे काम सुरू होते.

खिंडीतील तीव्र उताराच्या वळणावर तोडलेल्या डोंगरांची मोठी दरड, मोठ मोठे दगड-धोंडे, मुरुम-मातीसह कोसळल्याने मलबा काढण्यात अडथळे येत होते. अखेर दुपारनंतर दरड काढून रस्ता मोकळा करण्यात आला आहे. त्यामुळे वाहतूक सुरळीत सुरू आहे.

# अठरा महिन्यांपासून फरारी गुन्हेगार गजाआड

**पुणे । प्रतिनिधी**

तरुणाचा खून करण्याचा प्रयत्न केल्याच्या गुन्ह्यात १८ महिन्यांपासून फरार असलेल्या सराईत गुन्हेगारास शिवाजीनगर पोलिसांनी अटक केली. गावडे हा तम्मा कुसाळकर टोळीचा सदस्य असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

धनंजय राजेंद्र गावडे (वय ३०, रा. नरवीर तानाजी वाडी, शिवाजीनगर, पुणे) असे अटक केलेल्या सराइताचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गावडे याच्याविरुद्ध सुमारे दीड वर्षांपूर्वी एका तरुणावर प्राणघातक हल्ला केल्याप्रकरणी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल होता. या गुन्ह्यातील आरोपी



गावडेचा पोलिस शोध घेत होते. पोलिस उपनिरीक्षक अजित बडे, पोलिस हवालदार दीपक चव्हाण, प्रमोद मोहिते, पोलिस कर्मचारी सचिन जाधव आणि महावीर वलदे सोमवारी रात्री गस्तीवर होते. त्यांना गावडे हा शिवाजीनगर परिसरात येणार असल्याची माहिती खबऱ्यामार्फत मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून आरोपीला अटक केली. गावडे हा तम्मा कुसाळकर टोळीचा सदस्य असून, त्याच्याविरुद्ध यापूर्वी शिवाजीनगर, डेक्कन आणि विमानतळ पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. पोलिस आयुक्त अमितेश कुमार, पोलिस सहआयुक्त रंजनकुमार शर्मा, अतिरिक्त आयुक्त प्रवीणकुमार पाटील, पोलिस उपायुक्त संदीप गिल, सहाय्यक आयुक्त साईनाथ ठोंबरे यांच्या सूचनेनुसार वरिष्ठ पोलिस निरीक्षक चंद्रशेखर सावंत यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# स्वातंत्र्य दिनानिमित्त गुरूवारी मार्केट यार्ड व चारही उपबाजार राहणार बंद



**पुणे । प्रतिनिधी**

येत्या गुरूवारी (१५ ऑगस्ट) स्वातंत्र्य दिन आहे. या दिवशी दरवर्षी मार्केट यार्ड व उपबाजार बंद असतात. त्यानुसार यंदाही मार्केट यार्डातील मुख्य बाजारातील फळ-भाजीपाला, कांदा-बटाटा विभाग, केळी आणि गुरांचा बाजार, गुळभुसार विभाग, स्थापत्य विभाग, भांडार शाखा, छपाई लेखनसामुग्री, भुईकाटा केंद्र, पेट्रोप पंप, फुल बाजार, पान बाजार, माती परिक्षण व अन्न भेसळ प्रतिबंधक प्रयोगशाळा, तसेच मोशी, मांजरी, उत्तमनगर व खडकी येथील उपबाजार बंद राहणार आहेत. याची शेतकऱ्यांनी नोंद घ्यावी, शेतीमाल विक्रीस आणू नये, ग्राहकांनी खरेदीस येऊ नये, असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रभारी सचिव बाळासाहेब तावरे यांनी परिपत्रकच्या माध्यमातून केले आहे.

# स्वातंत्र्यदिनी राज्यात रिमझिम पाऊस

**पुणे । प्रतिनिधी**

१५ ऑगस्ट रोजी राज्यात रिमझिम पावसाचा अंदाज असून, विदर्भ वगळता मोठ्या पावसाचा कुठेही अंदाज नाही. मात्र, विदर्भातील बहुतांश भागात १५ व १६ रोजी मुसळधार पावसाचा अंदाज आहे. राज्यात मोठा पाऊस थांबला असला तरीही ढगाळ वातावरण कायम आहे.

गेल्या तीन दिवसांपासून ऊन आणि रिमझिम पाऊस असे वातावरण दिसत आहे. स्वातंत्र्यदिनीही कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात मोठ्या पावसाचा अंदाज नाही. मात्र रिमझिम पडेल, असाही



अंदाज हवामान विभागाने दिला आहे. विदर्भात सर्वच ठिकाणी १३ ते १६ ऑगस्टदरम्यान यलो अलर्ट दिला आहे.

राज्यात आधी नमूद केल्याप्रमाणे पाऊस १५ ऑगस्टपर्यंत कमी राहील. २२ ऑगस्टपर्यंत हळूहळू वाढ होण्याची शक्यता आहे आणि महिना अखेरपर्यंत चालू राहील. राज्यात आतापर्यंत सरासरीपेक्षा २९% जास्त पाऊस झाला आहे, या संदर्भातील माहिती पुणे हवामान विभागाचे विभागप्रमुख डॉ. के. एस होसाळीकर यांनी दिली आहे. दरम्यान जादा पावसामुळे काही ठिकाणी शेतकरी अडचणीत ही आला आहे, असेही ते म्हणाले.

# लाँग विकेंड निमित्त पुणे-नागपूर दरम्यान विशेष रेल्वे

**पुणे । प्रतिनिधी**

स्वातंत्र्यदिन (१५ ऑगस्ट) ते रक्षाबंधन (१९ ऑगस्ट) दरम्यान असलेल्या लाँग विकेंडनिमित्त रेल्वे विभागाने विशेष रेल्वे सोडण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामध्ये लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई ते नागपूर, लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई ते मडगाव, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई ते कोल्हापूर, पुणे ते नागपूर, कलबुर्गी ते बेंगळूरू या मार्गावर या रेल्वे सोडल्या जाणार आहेत.



पुणे ते नागपूर दरम्यान चार विशेष सुपरफास्ट एसी रेल्वे सोडल्या जाणार आहेत. रेल्वे क्रमांक ०२१४४ नागपूर-पुणे सुपर फास्ट एसी स्पेशल १४ ऑगस्ट आणि १६ ऑगस्ट रोजी नागपूर येथून सायंकाळी ७.४० वाजता सुटेल. ही गाडी दुसऱ्या दिवशी सकाळी ११.३५ वाजता पुण्याला पोहोचेल.

गाडी क्रमांक ०२१४३ पुणे-नागपूर सुपर फास्ट एसी स्पेशल १५ ऑगस्ट आणि १७ ऑगस्ट रोजी पुण्याहून सायंकाळी ४.१० वाजता सुटेल. ही गाडी दुसऱ्या दिवशी सकाळी ६.३० वाजता नागपूरला पोहोचेल. ही गाडी वर्धा, धामणगाव, बडनेरा, अकोला, शेगाव-मलकापूर, भुसावळ, मनमाड, कोपरगाव, बेलापूर, अहमदनगर, दौंड कॉर्ड लाईन, उरुळी येथे थांबेल. या चारही गाड्यांचे आरक्षण सुरु झाले आहे.

# शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीत फुले विद्यापीठ अग्रेसर

**इंदापूर । प्रतिनिधी**

''शैक्षणिक व्यवस्थेत वेळोवेळी ज्या सुधारणा होत गेल्या त्याचा महत्त्वाचा टप्पा म्हणजे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० या धोरणाच्या संरचनात्मक मांडणीत आणि अंमलबजावणीमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अग्रगण्य भूमिका घेतली आहे,'' असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता आणि हमी कक्षाचे संचालक डॉ. संजय ढोले यांनी केले.

इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नियोजन आणि विकास विभाग यांच्या समन्वयातून संस्थेचे अध्यक्ष आणि नवी दिल्ली येथील राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांच्या दिशानिर्देशानुसार प्राध्यापक आणि प्रशासकीय कर्मचारी यांच्यासाठी एक दिवसीय तालुकास्तरीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. यावेळी डॉ. ढोले बोलत होते. ही कार्यशाळा उद्घाटन, मार्गदर्शन, शंका व समाधान आणि समारोप अशा चार सत्रांमध्ये पार पडली.

फुले विद्यापीठाच्या मानव्य विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रभाकर देसाई म्हणाले, ''नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण समजावून घेणे अत्यावश्यक आहे. शैक्षणिक धोरण



अंमलबजावणीसाठी प्राध्यापक आणि कार्यालयीन कर्मचारी हे घटक अत्यंत महत्त्वाचे आहेत. धोरणात्मक बदल त्यांच्यापर्यंत पोहचावे आणि अंमलबजावणी सुकर व्हावी, यासाठी हे आयोजन केले जात आहे.''

प्राचार्य डॉ. जीवन सरवदे म्हणाले की, संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी वेळोवेळी नवीन धोरणांना सकारात्मकता दर्शवत प्राध्यापक आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांसाठी मार्गदर्शन व्हावे, ही अपेक्षा व्यक्त केली होती. त्यानुसार विद्यापीठाच्या सहकार्याने परिषद घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या शिबिराच्या समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अशोक काळंगे हे होते. डॉ. काळंगे यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने महाविद्यालयातील वस्तुस्थितीची निदर्शक मांडणी केली. यावेळी प्राचार्या उज्वला लोणकर, प्राचार्य डॉ. महादेव वाळुंज, प्राचार्य डॉ. लहू वावरे, प्राचार्य डॉ. घोडके, डॉ. शिवाजी वीर, डॉ. भीमाजी भोर, डॉ. सदाशिव उंबरदंड आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्याम सातर्ले यांनी केले. कार्यशाळेचे समन्वयक डॉ. संदीप शिंदे यांनी आभार मानले.

# अग्निशमन दलाच्या जवानांकडून विद्यार्थ्यांना प्रशिक्षण



**पिंपरी । प्रतिनिधी**

अग्निशमन दलाच्या जवानांकडून मोहन नगर, चिंचवड स्टेशन येथील श्रीमती लिलाबाई खिंवसरा मुळे प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अग्निशामक प्रशिक्षण देण्यात आले.

अग्निशामक विभागातील लिडींग फायरमन अनिल माने, ट्रेनि सब ऑफिसर अजय पवार, वाहन चालक राजेश साखळे, विजय चव्हाण, ट्रेनि फायरमन साहिल देवगडकर, तेजस पवार, सौरभ घोरपडे, गौरव सुरवसे, शिवाजी पवार यांनी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक दाखवत प्रशिक्षण दिले. शाळेमध्ये आग लागल्यास विद्यार्थ्यांनी काय खबरदारी घ्यावी, कुठल्या मार्गाने बाहेर पडावे, तसेच आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी काय प्रयत्न करावे, याबाबत अग्निशमन दलाच्या जवानांकडून विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष करून घेतले. आगीची घटना घडल्यास तात्काळ अग्निशमन विभागाला १०१ क्रमांकावर माहिती देण्याचे आवाहन करत फायर एक्सटिंग्यूशरचा वापर कसा करावा, याबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

# वकिलांनी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करावे - न्यायाधीश शिल्पा हुरगट

**मचर । प्रतिनिधी**

'वकिलांनी काळानुरूप बदलून नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे. आपल्या कामकाजात बदल करणे अपेक्षित आहे. आधुनीक तंत्रज्ञानाचा वापर करून पेपरलेस कामकाज करावे. ई फायलिंगमुळे वेळेची व पैशाची बचत होते न्यायालयीन कामकाजाला गती मिळते' असे घोडेगाव न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश शिल्पा हुरगट यांनी सांगितले.



घोडेगाव (ता. आंबेगाव) येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयातील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात ई.सी.टी.७ इ प्रोजेक्ट अंतर्गत वकील आणि त्यांचे लेखनिक यांच्यासाठी संगणकीय प्रशिक्षण कार्यक्रमात न्यायाधीश हुरगट बोलत होत्या. यावेळी सहन्यायाधीश सागर मोहिते, वकील संघाचे अध्यक्ष ड. प्रमोद काळे व घोडेगाव येथील संघाचे सदस्य उपस्थित होते.

यावेळी तज्ञ प्रशिक्षक ड. निलेश शेळके व ड. प्रकाश शहाणे यांनी https://filing.ecourts.gov.in/ या संकेतस्थळावर वकिलांनी ई कोर्ट, ई फायलिंगद्वारे दाखल करायचे नोंदणीपासून ते दावा/तक्रार दाखल कशी करायची त्याचबरोबर जुन्या प्रकरणात वकीलपत्र दाखल करण्यापासून त्यामध्ये इतर न्यायालयीन रोजच्या रोज चालणारे कामकाज कसे करायचे या बाबत तसेच न्यायालयाशी निगडित विविध संकेतस्थळांची माहिती देण्यात आली. उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली. ॲड. भूषण शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. ड. प्रमोद काळे यांनी आभार मानले. ॲड. हनुमंत पर्वत यांनी व्यवस्था पाहिली.

# पीएमआरडीएच्या दक्षता अधिकारी पदी अमोल तांबे यांची नियुक्ती

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए)च्या पोलीस अधीक्षक/दक्षता अधिकारी पदी अमोल तांबे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचे आदेश शासनाचे सहसचिव व्यंकटेश भट यांनी दिले आहेत.

गृह विभागाने भारतीय पोलीस सेवा, राज्य पोलीस सेवेतील १८ अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या. त्यामध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे पोलीस अधीक्षक पदावर कार्यरत असलेले अमोल तांबे यांची पीएमआरडीएच्या पोलीस अधीक्षक/दक्षता अधिकारी पदी बदली केली आहे. अमोल तांबे जागी सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांची बदली झाली आहे. पीएमआरडीएचे पोलीस अधीक्षक/दक्षता अधिकारी दिगंबर प्रधान यांची पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नागपूर येथे बदली झाली आहे. बारामतीचे अपर पोलीस अधीक्षक संजय जाधव यांची पोलीस अधीक्षक धाराशिव येथे बदली झाली. साताऱ्याचे अपर पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांची समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक एक, पुणे येथे बदली झाली. पदस्थापनेच्या प्रतीक्षेत असलेले नंदकुमार ठाकूर यांची पोलीस प्रशिक्षण केंद्र दौंड येथे प्राचार्य पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

# पुणे शहरासह जिल्ह्यातून आठ सराईत गुन्हेगार तडीपार

**पुणे । प्रतिनिधी**

शहरातील हडपसर, मुंढवा, बिबवेवाडी आणि मार्केट यार्ड परिसरातील आठ सराईत गुन्हेगारांना पुणे, पिंपरी-चिंचवड शहर आणि जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले आहे. सहा महिने ते दोन वर्षे या कालावधीसाठी त्यांना तडीपार करण्यात आल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली.




शहरातील गुन्हेगारी नियंत्रणात आणण्यासाठी रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांवर कारवाई करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने परिमंडळ पाचच्या कार्यक्षेत्रातील आठ सराईत गुन्हेगारांवर १२ ऑगस्ट रोजी तडीपारीची कारवाई करण्यात आली. तडीपारीच्या कालावधीत सराईत गुन्हेगार आढळून आल्यास पोलिस नियंत्रण कक्षातील ११२ क्रमांकावर किंवा नजीकच्या पोलिस ठाण्यात संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

आनंद चिंतामणी गायकवाड (वय ५३, रा. मुंढवा), आतिश सूरज बाटुंगे (वय २५, रा. केशवनगर, मुंढवा), विजय सिद्धप्पा कटिमणी (रा. अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी) आणि रवी मारुती चक्के (वय ३०, रा. साडेसतरानळी, हडपसर) या सराईत गुन्हेगारांना दोन वर्षांसाठी तडीपार करण्यात आले आहे. शांताबाई यलप्पा कटिमणी (वय ५२, रा. बालाजीनगर, घोरपडी गाव), कन्या अभिमन्यू राठोड (वय ३५, रा. गव्हाणे वस्ती, गंगाधाम रस्ता, बिबवेवाडी) आणि दिलेर अन्वर खान (वय ३४, रा. आंबेडकरनगर, मार्केट यार्ड) या तिघांना एक वर्षासाठी, तर बापू अशोक जाधव (वय ४७, रा. लोणकर वस्ती) याला सहा महिन्यांसाठी तडीपार करण्यात आल्याचा आदेश पोलिस उपायुक्त ए. राजा यांनी दिला आहे.